**MSP Mandal's**

# Sunderrao Solanke Mahavidyalaya, Majalgaon. Dist: Beed (MS) India-431131

**Affiliated to Dr. Babasaheb Ambedkar University, Aurangabad**

(NAAC Reaccredited 'A' Grade with CGPA 3.21)

Department of Chemistry and Botany

Academic Year 2023-2024

INDUSTRIAL VISIT AT SUGAR FACTORY

The Department of Chemistry and Botany organized one day visit to the Sunderaoji Solanke Sahakari Sugar Industry, at Telgaon on 7th March 2024 for undergraduate students. In this visit 25 students were participated along with the faculty members. The student and faculty members gathered at the college at 7:30 am and travelled by Mini bus and reached to the sugar industry at 9:00 am.

This sugar industry situated in 165 Acres of land, out of which 35 acres land is utilized for sugar production, processing and remaining land used for the industrial process. This sugar factory has electricity co-generation project, soil testing laboratory, water purification plant, agro-fertilization production unit, tissue culture laboratory and alcohol production unit. The Production Engineer Mr. Bhagwat R. Jagdale explained the physical process of the manufacturing of the sugar, water purification plant and other related working unit existing in the industry. Mr. Ashok Shendage, Chemist explained the various chemical processesinvolved during the manufacturing of sugar.

This knowledge regarding the Sugar Manufacturing Processes really helps the students for better understanding in their practical knowledge. The sugar in this industry is graded into three types i.e. medium (M), super sugar (S.S.) and small (S). According to M. Jagdale and Shendage daily there is 5000 bags are produced in one session, otherwise it is depend upon incoming sugar cane quantity.

This total visit and demonstration concluded at 5:00 pm then afterward we return to the college. This visit was really very much beneficial to the student. We are very much thankful to the Mr. M. D. Ghorpade (M.D., SunderraoSolankeSahakari Sugar Industry, and Telgaon) for providing us the permission and facility during this visit.

The following Teachers are participated

1) Dr. S. N. Ipper ( Head, Department of Chemistry)
2) Dr. I. B. Salunkhe ( Head, Department of Botany)

Sunderrao Solanke Mahavidyalaya, Majalgaon Dist-Beed. Department of Chemistry

HEAD
Department Of Chemistry
Sunderrao Solanke Mahavidyalaya
Majalgaon, Dist.Beed.




परळी संघर्षनेता

# सुंदरराव सोळंके महाविद्यालयाची तेलगाव कारखाना येथे सहल



माजलगाव / अनंत घडसिंगे

धारूर तालुक्यातील तेलगाव जवळील लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना येथे दि. 07 मार्च गुरुवार रोजी माजलगाव येथील सुंदररावजी सोळंके महाविद्यालयाच्या द्वितीय वर्ष व तृतीय वर्षीच्या सायन्स विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल काढण्यात आली.या सहली मध्ये 25 विद्यार्थी सहभाग नोंदवला. प्राध्यापक डॉ. आय बी सोळंके व डॉ. ईप्पर एस एन यांनी विद्यार्थ्यांना कारखाना पाहून माहिती दिली. कारखान्यांमध्ये डिसलरी प्रकल्प खत प्रकल्प इथेलोन प्रकल्प माती परीक्षण लॅब विद्युत प्रकल्प तसेच कारखान्यांमधील साखर कशी तयार होते हेही दाखविण्यात आले. कारखान्या मधील सुरक्षा अधिकारी ठोंबरे व इंजिनिअर खके यांनी विद्यार्थीनां सर्व कारखान्याची इतंभूत माहिती दिली. सर्व विद्यार्थी व शिक्षक यांनी कारखाना पाहून त्यांना माहितीही मिळाली व साखर खान्याचा त्यांनी आनंद लुटला.

**Following Students were participated for Industrial Visit at Sugar Factory Telgaon**

| Sr No | Name of the Student | Class |
|---|---|---|
| 1. | JADHAV KOMAL GANESH | B. Sc. T. Y. |
| 2. | JADHAV NIKITA NAVNATH | B. Sc. T. Y. |
| 3. | JADHAV RADHIKA PARMESHWAR | B. Sc. T. Y. |
| 4. | JANGALE ARCHANA SUNDERRAO | B. Sc. T. Y. |
| 5. | BADADE GEETA PRALHAD | B. Sc. T. Y. |
| 6. | BAHIRE VAISHNAVI MAHADEV | B. Sc. T. Y. |
| 7. | BANGAL SAKSHI SHANTINATH | B. Sc. T. Y. |
| 8. | BHADARGE DESHANA KISHAN | B. Sc. T. Y. |
| 9. | FULGE AISHWARYA AASARAM | B. Sc. T. Y. |
| 10. | FULGE PRIYANKA BALIRAM | B. Sc. T. Y. |
| 11. | JANGALE ARCHANA SUNDERRAO | B. Sc. T. Y. |
| 12. | JASWAD ASHWINI SAHEBRAO | B. Sc. T. Y. |
| 13. | KALE MAYURI SUDHAKAR | B. Sc. T. Y. |
| 14. | KALE DIVYA BAJIRAO | B. Sc. T. Y. |
| 15. | KAMALE SUMIT SUKHADEV | B. Sc. T. Y. |
| 16. | KUKADE NIKITA MOTIRAM | B. Sc. T. Y. |
| 17. | KULKARNI BHAGYASHRI DILIPRAO | B. Sc. T. Y. |
| 18. | KURE AARTI GANESHRAO | B. Sc. T. Y. |
| 19. | LANGADE MOHINI NARAYAN | B. Sc. T. Y. |
| 20. | MANE PRATIKSHA YUVRAJ | B. Sc. T. Y. |
| 21. | MANIYAR BIBI HAJRA SAMIYODDIN | B. Sc. T. Y. |
| 22. | MENDAKE VISHAL LAXMAN | B. Sc. T. Y. |
| 23. | MORE SUREKHA SUBHASH | B. Sc. T. Y. |
| 24. | NAIKNAWARE VAISHNAVI VILASRAO | B. Sc. T. Y. |
| 25. | NAIKNAWARE VITTHAL JALINDHAR | B. Sc. T. Y. |

Sunderrao Solanke Mahavidyalaya, Majalgaon Dist. Beed. Department of Chemistry

HEAD
Department Of Chemistry
Sunderrao Solanke Mahavidyalaya
Majalgaon, Dist.Beed.

Coordinator
Internal Quality Assurance Cell (IQAC)
Sunderrao Solanke Mahavidyalaya,
Majalgaon. Dist.Beed (MS)

PRINCIPAL
Sunderrao Solanke Mahavidyalya
Majalgaon Dist. Beed (M.S.)

म.शि.प्र.मंडळाचे

# सुंदरराव सोळंके महाविद्यालय

माजलगाव, ता.माजलगाव,जि.बीड (महा.) - ४३११३१

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

नियमित कार्यक्रम अहवाल २०२३-२४



डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
*संलग्नित व मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचालित*

# सुंदरराव सोळंके महाविद्यालय

माजलगाव, तामाजलगाव., जिबीड.

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

# नियमित कार्यक्रम अहवाल

## २०२३-२४

## प्राचार्य

डॉ.जी.के.सानप

## कार्यक्रमाधिकारी

डॉ. नितीन ढवळे    प्रा. उमेश राठोड    डॉ. बिलास काळे

डॉ.ओ.एच.सारगे

**NOT ME BUT YOU**

## महात्मा फुले जयंती

दि. ११-०४-२०२३ रोजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने क्रांतीसुर्य महात्मा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या स्मृतीस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जी. के. सानप सर होते. उपप्राचार्य प्रा. पवन शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. महात्मा फुले यांनी सार्वजनिक सत्यधर्माची स्थापना करून समाजातील अनिष्ट चालीरीती व परंपरा, सामाजिक प्रश्नांवर समाजाचे प्रबोधन करण्याचे काम केले. महात्मा फुलेंनी बहुजन समाजाच्या उद्धारासाठी शिक्षण व वैज्ञानिक दृष्टिकोन यांचे महत्त्व आपल्या साहित्यात अधोरेखित केले. शेतकऱ्यांचा आसूड नावाचे पुस्तक लिहून शेतकऱ्यांची व्यथा त्यांनी आपल्या लिखाणातून समाजासमोर मांडली असे प्रतिपादन डॉ.जी.के.सानप सर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात केले. याप्रसंगी रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. नितीन ढवळे यांच्यासह महाविद्यालयीन प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व रासेयो विद्यार्थी यांची उपस्थिती होती.




## रासेयो कार्यक्रमाधिकारी कार्यशाळा

दि.१३-०४-२०२३ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छ.संभाजीनगर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने औपचारिक शिक्षण व नियमित रोजगार नसलेल्या युवकांचे सर्वेक्षण या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेत कार्यक्रमाधिकारी डॉ.नितीन ढवळे यांनी सहभाग नोंदवला.




## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती

दि.14-04-2023 रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. एन के मुळे, डॉ. एम.ए. कव्हळे, प्रा. पवन शिंदे, प्रा. प्रकाश गवते यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.




## राष्ट्रीय सेवा योजना राज्यस्तरीय अधिवेशन

दि.२६ ते २७ मे २०२३ या कालावधीत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे येथे दोन दिवसीय रासेयो कार्यक्रमाधीकार्याचे आधीवेशन पार पडले. या अधिवेशनात कार्यक्रमाधिकारी डॉ.नितीन ढवळे यांनी सहभाग नोंदवला.



राष्ट्रीय सेवा योजना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय कक्ष, महाराष्ट्र शासन
राष्ट्रीय सेवा योजना, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
आयोजित
'राज्यस्तरीय राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी अधिवेशन'
(विषय : जी-२० अंतर्गत शैक्षणिक उपक्रम व पंचप्रण : युवासंवाद)
दिनांक : २६ व २७ मे, २०२३, स्थळ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

सहभाग प्रमाणपत्र

प्रा./डॉ./कु.: नितिन रघुनाथराव ढवळे
विद्यापीठ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद
यांनी दि. २६ व २७ मे, २०२३ दरम्यान पै. खाशाबा जाधव क्रीडा संकुल, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे याठिकाणी राष्ट्रीय सेवा योजना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, आणि राष्ट्रीय सेवा योजना, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, आयोजित 'राज्यस्तरीय राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी अधिवेशन' (विषय : जी-२० अंतर्गत शैक्षणिक उपक्रम व पंचप्रण : युवासंवाद) या उपक्रमामध्ये सहभाग घेतल्याबद्दल सदर प्रमाणपत्र प्रदान करण्यात येत आहे.

डॉ. सदानंद भोसले
संचालक
राष्ट्रीय सेवा योजना

डॉ. रामेश्वर कोठावळे
राज्यसंपर्क अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना

## शिवस्वराज्य दिन

दि.06-06-2023 रोजी महाविद्यालयात शिवराज्याभिषेक दिनाच्या निमित्ताने शिवस्वराज्य दिनाचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाप्रसंगी इतिहास विभागाचे प्रा.डॉ. बी.आर. बोडके सर यांनी मार्गदर्शन केले. छत्रपती शिवाजी महाराजांनी अठरापगड समाजातील लोकांना सोबत घेऊन स्वराज्य उभे केले. जिजामाताचे हे स्वप्न सत्यात उतरवण्यासाठी शिवविचारांनी प्रेरित होऊन असंख्य मावळयांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिले. स्वराज्य उभे करत असताना महाराजांना परकीयांबरोबरच स्वकीयांसोबतही लढावे लागले व त्याचेच फलित म्हणून  अखेर दिनांक 6 जून 1674 रोजी रयतेच्या राजाचा राज्याभिषेक संपन्न झाला असे सांगितले.

या कार्यक्रमाची सांगता महाराष्ट्र गीत व राष्ट्रगीताच्या गायनाने करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी.के. सानप सर होते. याप्रसंगी उपप्राचार्य गवते सर, डॉ. डी.एस.शिंदे, डॉ.के.बी. गंगणे, डॉ. बी.आर. नळे, डॉ. एस.बी. देशमुख, डॉ.आर.टी. पवार, कार्यक्रमाधिकारी प्रा. उमेश राठोड, प्रा. सुदर्शन स्वामी, प्रा. वैजवाडे, श्री. एकनाथ मस्के, श्री. लगड यांच्यासह विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संचालन कार्यक्रमअधिकारी डॉ. एन.आर. ढवळे यांनी केले.






## सुंदरराव सोळंके महाविद्यालयात शिवस्वराज्य दिन साजरा

तरुण भारत

तभा वृत्तसेवा

माजलगाव दि.७ जून म.शी.प्र. मंडळाच्या, सुंदरराव सोळंके महाविद्यालयात शिवराज्याभिषेक दिनाच्या निमित्ताने शिवस्वराज्य दिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी.के. सानप होते. तर इतिहास विभागाचे प्रा.डॉ. बी.आर. बोडके मार्गदर्शक होते. यावेळी बोलताना प्रा बोडके म्हणाले की छत्रपती शिवाजी महाराजांनी अठरापगड समाजातील लोकांना सोबत घेऊन स्वराज्य उभे केले. स्वराज्य उभे करत असताना महाराजांना परकीयांबरोबरच स्वकीयांसोबतही लढावे लागले व त्याचेच फलित म्हणून अखेर रयतेच्या राजाचा राज्याभिषेक संपन्न झाला.प्राचार्य डॉ जी.के सानप म्हणाले की छ. शिवाजी महाराजांनी आपल्याच भूमीत आपले राज्य या संकल्पनेतुन स्वराज्य निर्माण केले. राज्यभिषेक दिन म्हणजे भारतीयांचा खऱ्या अर्थाने स्वाभिमानी दिन होय. या कार्यक्रमाची सांगता महाराष्ट्र गीत व राष्ट्रगीताच्या गायनाने करण्यात आली. याप्रसंगी उपप्राचार्य गवते सर, डॉ. डी.एस.शिंदे, डॉ.के.बी. गंगणे, डॉ. बी.आर. नळे, डॉ. एस.बी. देशमुख, डॉ.आर.टी. पवार, कार्यक्रमाधिकारी प्रा. उमेश राठोड, प्रा. सुदर्शन स्वामी, प्रा. वैजवाडे, एकनाथ मस्के, लगड यांच्यासह विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संचालन कार्यक्रमअधिकारी डॉ. एन.आर. ढवळे यांनी केले.

## जागतिक पर्यावरण दिन

दिनांक 6 जून 2023 रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी वनस्पती शास्त्रीय विभागाची विभाग प्रमुख डॉक्टर आयबी साळुंखे सर यांनी "एकच पृथ्वी" या विषयावर राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांना सखोल असे मार्गदर्शन केले. याप्रसंगी वनस्पती शास्त्र विभागाचे डॉ. महेंद्र वानखेडे, कार्यक्रमाधिकारी डॉ. नितीन ढवळे, डॉक्टर उमेश राठोड व स्वयंसेवकांची उपस्थिती होती.



## सल्लागार समिती बैठक

दि. २० जून २०२३ रोजी २०२३-२४ या शैक्षणिक वर्ष्याच्या पार्श्वभूमीवर प्राचार्य डॉ.जी.के.सानप यांच्या अध्यक्षतेखाली रासेयो सल्लागार समिती गठीत करण्यात आली. या बैठकीमध्ये २०२३-२४ या वर्षाचा रासेयो कार्यक्रमाचा आराखडा रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.नितीन ढवळे यांनी सादर केला. या आराखड्यावर सल्लगार समितीतील सदस्यांनी चर्चा करून त्यात काही बदल सुचवले. या बैठकीला उपस्थित राहिल्याबद्दल कार्यक्रमाधिकारी डॉ.नितीन ढवळे यांनी सर्वांचे आभार मानले.

## आंतरराष्ट्रीय योग दिन

दि. 21-06-2023 रोजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने 21 जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या शिबिराचे उद्घाटन म.शि.प्र. मंडळाच्या केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य मा. विजयकुमार सोळंके यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. के. सानप, उपप्राचार्य डॉ. एम. ए. कव्हळे, कार्यक्रमाधिकारी डॉ. नितीन ढवळे, अधीक्षक श्री. सतीश एरंडे, प्रबंधक श्री. प्रशांत चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. शिबिरामध्ये सुरुवातीला दैनंदिन जीवनात योगाचे महत्व सांगण्यात आले. नंतर योगाभ्यास तसेच विविध आसने करून घेण्याबरोबरच त्यांचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. या शिबिरामध्ये आर्ट ऑफ लिविंग या संस्थेचे योग प्रशिक्षक मा. नंदकुमार शिंदे, मा. श्रीकृष्ण शेजुळ, मा. संजय मेहता यांनी या शिबिरात उपस्थितांना प्रशिक्षण देऊन मार्गदर्शन केले. या शिबिरास राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.






### सुंदरराव सोळंके महाविद्यालयात योग दिन साजरा

तभा वृत्तसेवा
माजलगाव दि.२२ जून

येथील सुंदरराव सोळंके महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

या शिबिराचे उद्घाटन म.शि.प्र. मंडळाच्या केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य विजयकुमार सोळंके यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. के. सानप, उपप्राचार्य डॉ. एम. ए. कव्हळे, कार्यक्रमाधिकारी डॉ. नितीन ढवळे, प्रबंधक प्रशांत चव्हाण, अधीक्षक सतीश एरंडे,यांची प्रमुख उपस्थिती होती. शिबिरामध्ये सुरुवातीला दैनंदिन जीवनात योगाचे महत्व सांगण्यात आले. नंतर योगाभ्यास तसेच विविध आसने करून घेण्याबरोबरच त्यांचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. या शिबिरामध्ये आर्ट ऑफ लिविंग या संस्थेचे योग प्रशिक्षक नंदकुमार शिंदे, श्रीकृष्ण शेजुळ, संजय मेहता यांनी या शिबिरात उपस्थितांना प्रशिक्षण देऊन मार्गदर्शन केले. या शिबिरास राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## छ.शाहू महाराज जयंती

दि.२६ जून २०२३ रोजी महाविद्यालयात छ.शाहू महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ.जी.के.सानप यांची उपस्थिती होती. या प्रसंगी उपप्राचार्य डॉ. एम ए कव्हळे यांनी आपल्या मार्गदर्शनात छत्रपती शाहू महाराज यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाप्रसंगी डॉ. एन के मुळे, प्रा. प्रकाश गवते, प्रा. पवन शिंदे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी प्राध्यापक व स्वयंसेवकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.



## वसंतराव नाईक जयंती

दि. १ जुलै रोजी महाविद्यालयात रासेयो विभागाच्या वतीने माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची जयंती साजरी करण्यात आली.




## वृक्षारोपण (वनसप्ताह १ ते ७ जुलै)

दि.५ जुलै रोजी रासेयो विभागाच्या वतीने वनसप्ताह निमित्त वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जी.के.सानप, उपप्राचार्य डॉ.एन.के.मुळे, डॉ.एम.ए.कव्हळे, कार्यक्रमाधिकारी डॉ.नितीन ढवळे,डॉ.बिलास काळे, डॉ.डी.एस.शिंदे, डॉ.सचिन रुद्रवार यांच्यासह प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी यांची उपस्थिती होती.




## मतदार जनजागृती कार्यक्रम

दि.२० जुलै रोजी महाविद्यालयात निवडणूक आयोगाच्या विशेष पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत नवीन मतदार नावनोंदणी संदर्भात जनजागृती करण्यात आली. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जी.के.सानप होते. त्याचबरोबर डॉ.एस.बी.देशमुख, प्रा.एम.के.अलझेंडे, कार्यक्रमाधिकारी डॉ.नितीन ढवळे, प्रा.यु.के.राठोड यांच्यासह विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.






## वृक्षारोपण

दि.२१ जुलै रोजी महाविद्यालयात वाणिज्य विभागासमोर वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी पाच वेगवेगळया वृक्षाची लागवड करण्यात आली. याप्रसंगी कार्यक्रमाधिकारी डॉ.नितीन ढवळे, डॉ.बिलास काळे, डॉ.सचिन रुद्रवार यांच्यासह स्वयंसेवकांची उपस्थिती होती.




## अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी

दि. ०१-०८-२०२३ रोजी महाविद्यालयात अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाप्रसंगी अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. के. सानप सर होते. प्रमुख पाहुणे म्हणून इतिहास विभाग प्रमुख डॉ. बी आर बोडके सर उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. बी आर बोडके सरांनी लोकशाहीर आण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या कार्यावर प्रकाश टाकला. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे आपल्या लेखणीच्या माध्यमातून समाजाला परिवर्तनाची दिशा दाखवली व लोकमान्य टिळक यांनी भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात आपले मोलाचे योगदान दिले. या दोन्ही महामानवांचे विचार वकृत्व समाजासाठी प्रेरणादायी आहेत असे विचार मांडले.

या प्रसंगी प्रा.बेले, ग्रंथपाल दत्ता सोळंके, प्रबंधक प्रशांत चव्हाण, अधीक्षक सतीश एरंडे,लेखापाल महेंद्र अहिरराव यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाप्रसंगी प्राध्यापक व स्वयंसेवकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.



## तंबाखू मुक्त परिसर

दि. ०१ ऑगस्ट २०२३ रोजी तंबाखू मुक्त परिसर अभियानाअंतर्गत महाविद्यालयाच्या परिसरात फलक लावून जनजागृती करण्यात आली. याप्रसंगी कार्यक्रमाधिकारी डॉ.नितीन ढवळे, डॉ.बिलास काळे, डॉ.शंकर इप्पर, डॉ.गणेश मोकासरे व स्वयंसेवक रामेश्वर मोरे उपस्थित होते.




## ऑगस्ट क्रांती दिन

दि. ०९ ऑगस्ट २०२३ रोजी महाविद्यालयात ऑगस्ट क्रांती दिनाच्या निमित्ताने शहीद भगतसिंग यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाधिकारी प्रा.उमेश राठोड व स्वयंसेवक विद्यार्थी उपस्थित होते.




## *विकसित भारत पंच-प्रण प्रतिज्ञा*

दि.१० ऑगस्ट २०२३ रोजी पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांच्या संकल्पानुसार विकसित भारत@२०४७ या मोहिमे अंतर्गत महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना पंच-प्रण शपथ देण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जी.के.सानप, उपप्राचार्य डॉ. एन. के. मुळे, डॉ. एम. ए. कव्हळे, प्रा. पवन शिंदे, प्रा. प्रकाश गवते, अधीक्षक सतिश येरंडे, कार्यक्रमधिकारी डॉ. नितीन ढवळे, डॉ.बिलास काळे, प्रा.उमेश राठोड यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## आरोग्य शिबिराचे आयोजन

दि.११ ऑगस्ट रोजी महाविद्यालयात कर्मचारी व विद्यार्थ्यासाठी आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिराचे उदघाटन प्राचार्य डॉ.जी.के.सानप यांच्या हस्ते झाले. शिबिरात एकूण ८० विद्यार्थी व कर्मचार्यांनी सहभाग घेतला.



## अंतरराष्ट्रीय युवा दिन व मेरी माती मेरा देश अभियान जनजागृती फेरी

दि.१२ ऑगस्ट २०२३ रोजी अंतरराष्ट्रीय युवा दिन व मेरी माती मेरा देश अभियान अंतर्गत शहरातून जनजागृती फेरी काढण्यात आली. या फेरीला प्राचार्य डॉ.जी.के.सानप यांनी हिरवा झेंडा दाखवून सुरुवात केली. या जनजागृती फेरीमध्ये स्वयंसेवक व विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवला.




## अंतरराष्ट्रीय युवा दिन व्याख्यान

दि.१२ ऑगस्ट २०२३ रोजी अंतराष्ट्रीय युवा दिनाच्या निमित्ताने माजलगाव सत्र न्यायालयाच्या सह दिवाणी न्यायाधीश श्रीमती आर.एस.गोसावी यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालय विकास समितीचे प्रमुख अॅड. भानुदासराव डक, प्राचार्य डॉ.जी.के.सानप यांच्यासह कार्यक्रमाधिकारी नितीन ढवळे, डॉ.बिलास काळे, प्रा.उमेश राठोड यांच्यासह प्राध्यापक, कर्मचारी व स्वयंसेवक यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.



## घरोघरी तिरंगा मोहीम

दि.१३ ते १५ ऑगस्ट या कालावधीत महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापक तसेच कर्मचार्यांना आपापल्या घरावर भारतीय तिरंगा फडकावून या मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन प्राचार्य व रासेयो विभागाच्या वतीने करण्यात आले.




## मराठवाडा मुक्ती संग्राम दिन

दि.२४ ऑगस्ट २०२३ रोजी शाश्वत विकासासाठी हरित क्रांती तरुणांची या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. माजलगाव ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.गजानन रुद्रवार यांनी उपस्थित स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी आय.सी.टी.सी विभागाचे समुपदेशक श्री.शैख शहाबुद्दीन यांच्यसह कार्यक्रमाधिकारी डॉ.नितीन ढवळे, डॉ.बिलास काळे यांच्यासह विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.




दैनिक लोकाशा महाराष्ट्राच्या मनाचा नकाशा
25AUG2023

## शाश्वत विकासासाठी हरितक्रांती तरुणांची या विषयावर व्याख्यान



माजलगाव, दि.२५ (लोकाशा न्युज):- रेड रिबन क्लब, राष्ट्रीय सेवा योजना विभाग सुंदरराव सोळंके महाविद्यालय व खउढउ विभाग, ग्रामीण रुग्णालय माजलगाव यांच्या संयुक्त विद्यमाने जगाच्या शाश्वत विकासासाठी हरितक्रांती तरुणांची या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी डॉ. गजानन रुद्रवार (वैद्यकीय अधिकारी ग्रामीण रुग्णालय माजलगाव) यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. एचआयव्ही- एड्स सारख्या आजाराला बळी पडणार्यांमध्ये तरुणांची संख्या लक्षणीय आहे. तरुणांच्या खांद्यावरती उज्वल भारताची जबाबदारी आहे. त्यामुळे तरुणांनी एचआयव्ही एड्स सारख्या आजारापासून बचाव करण्यासाठी आवश्यक ती काळजी घेतली पाहिजे व समाजामध्ये याबाबत जनजागृतीही केली पाहिजे. असे प्रतिपादन डॉ.गजानन रुद्रवार यांनी केले. समुपदेशक श्री शहाबुद्दीन शेख यांनीही उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कोण कोणत्या मार्गाने एचआयव्ही एड्स प्रसार होतो व कोणत्या मार्गाने एचआयव्ही एड्सचा प्रसार होत नाही याबाबतची सविस्तर माहिती दिली तसेच विद्यार्थ्यांच्या मनात एचआयव्ही एड्स संदर्भात असणारे गैरसमज दूर केले. याप्रसंगी प्रयोगशाळा तंत्रज्ञ शेख रईस यांच्यासह रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.नितीन ढवळे, डॉ.बिलास काळे, प्रा. शुभांगी अंबले यांच्यासह विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

## स्वयंसेवकांसाठी आर्थिक साक्षरता कार्यशाळा

दि.२९ ऑगस्ट २०२३ रोजी रासेयो विभागातर्फे महाविद्यालयात आर्थिक साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत एन.एस.ई च्या गुंतवणूकदर प्रशिक्षण विभागाच्या प्रशिक्षक श्रीमती सृजना मामिडला यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना गुंतवणूक सुरक्षा विषयक मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.जी.के.सानप होते. याप्रसंगी प्राध्यापक व विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.




## वृक्षारोपण

दि.३१ ऑगस्ट २०२३ रोजी महाविद्यालयात रासेयो विभागातर्फे वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमाधिकारी डॉ.नितीन ढवळे,डॉ.बिलास काळे यांच्यासह रासेयो स्वयंसेवकांची उपस्थिती होती.




## ९ ते १७ सप्टे. २०२३ मेरी माटी मेरा देश (Selfie With Mati)

दि.९ ते १७ सप्टे. २०२३ या कालावधीत मेरी माटी मेरा देश या मोहिमे अंतर्गत Selfie With Mati ही मोहीम रासेयो विभागातर्फे महाविद्यालयात राबविण्यात आली.




## मराठवाडा मुक्ती संग्राम दिन व्याख्यान

दि.१६ सप्टेंबर २०२३ रोजी महाविद्यालयात रासेयो विभागातर्फे प्रा.जयदेव डोळे यांचे मराठवाड्याचा मुक्तीसंग्राम या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.जी.के.सानप. होते तर उपप्राचार्य डॉ.एन.के.मुळे.डॉ.एम.ए.कव्हळे, प्रा.प्रकाश गवते, प्रा.पवन शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमास प्राध्यापक,कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.




## अमृत कलश माती संकलन

दि. 17 सप्टेंबर 2023 रोजी महाविद्यालयात मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी मेरी माती मेरा देश मोहिमेच्या अनुषंगाने मातीला वंदन करून परिसरातील पवित्र मातीचे संकलन करण्यात आले. सदर संकलित केलेली माती ३१ ऑगस्ट रोजीच्या दिल्ली येथे निर्माण करण्यात येणाऱ्या अमृत वाटिकेत विलीन करण्यात येणार आहे. या माती संकलन कार्यक्रमात महाविद्यालयाच्या स्थानिक नियामक मंडळाचे सदस्य तसेच विद्यार्थ्यासह प्राध्यापक कर्मचारी यांनीही सहभाग नोंदवला.




## नवीन मतदार नोंदणी अभियान

दि.२१ सप्टेंबर २०२३ रोजी महाविद्यालयातील १८ वर्षे पूर्ण होणार्या व झालेल्या विद्यार्थ्यांचे मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी मतदार नोंदणी कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी तहसीलदार श्रीमती वर्षा मनाळे यांची उपस्थिती होती. बीएलओ व कार्यक्रमाधिकारी यांनी इ-वोटर च्या माध्यमातून नाव नोंदणी केली. या शिबिरात ६० विद्यार्थ्यांनी नाव नोंदणी केली.




## राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस व कार्यशाळा

दि. २४ सप्टेंबर २०२३ रोजी विभागाच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजनेचा स्थापना दिवस साजरा करण्यात आला. स्थापना दिनाच्या निमित्ताने स्वयंसेवकांसाठी "राष्ट्रीय सेवा योजना व व्यक्तिमत्व विकास" या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेचे उद्घाटन प्रा. बालाजी बोडके यांनी वृक्षारोपण करून केले. अध्यक्ष म्हणून उपप्राचार्य डॉ. एम. ए. कव्हळे यांची उपस्थिती होती. आपल्या उद्घाटकीय भाषणात प्रा. बालाजी बोडके यांनी राष्ट्रीय सेवा योजना म्हणजे काय?, या योजनेची पार्श्वभूमी, या योजनेमुळे विद्यार्थ्यांच्या जीवनात होणारा सकारात्मक बदल व त्यांचा समाजाकडे व सामाजिक समस्यांकडे बघण्याचा दृष्टिकोन कशा पद्धतीने सकारात्मक बनतो या दृष्टिकोनातून राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व विशद केले.अध्यक्ष म्हणून उपप्राचार्य डॉ. एम. ए. कव्हळे सर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच आपली समाजाप्रती असणारी सामाजिक जबाबदारी पार पाडण्यासाठी संधी उपलब्ध करून देते असे सांगितले. याप्रसंगी प्रथम सत्र मध्ये "राष्ट्रीय सेवा योजनेची ओळख" या विषयावर कार्यक्रमाधिकारी डॉ. नितीन ढवळे यांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या द्वितीय सत्रामध्ये डॉ. एम. ए. कव्हळे सर यांनी "राष्ट्रीय सेवा योजना व व्यक्तिमत्व विकास" या विषयावर सखोल असे मार्गदर्शन केले.





## स्वच्छ भारत पंधरवडा

दि. २७ सप्टेंबर २०२३ रोजी नियमित कार्यक्रमाचा भाग म्हणून स्वच्छ भारत पंधरवाडाच्या निमित्ताने महाविद्यालयामध्ये जनजागृती फेरीचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी उपस्थित विद्यार्थ्यांना स्वच्छातेची शपथ देण्यात आली. फेरीत २५० स्वयंसेवकांनी सहभाग नोंदवला.










## शहीद भगतसिंग जयंती

दि. २८ सप्टेंबर २०२३ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने शहीद-ए-आजम भगतसिंग जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी कार्यक्रमाधिकारी डॉ. नितीन ढवळे यांनी शहीद भगतसिंग यांचे जीवन कार्यावर प्रकाश टाकला.




## महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री जयंती

दि. २ ऑक्टोबर २०२३ रोजी विभागाच्या वतीने राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली.




## युवा पोर्टल जनजागृती कार्यक्रम

दि.२३ ऑक्टोबर २०२३ रोजी भारत सरकारने महाविद्यालयीन युवकांना प्रक्षिक्षण व रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने तयार केलेल्या तयार केलेल्या युवा पोर्टलची माहिती तसेच नोंदणीची कार्यपद्धती रासेयो स्वयंसेवक तसेच विद्यार्थ्यांना विषद करण्यात आली. याप्रसंगी कार्यक्रमाधिकारी डॉ.नितीन ढवळे यांनी उपस्थिताना मार्गदर्शन केले. यावेळी डॉ.एस.सी.मोतेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.




## कर्करोग समुपदेशन कार्यशाळा

दि.२७ ऑक्टोंबर २०२३ रोजी महाविद्यालयात रासेयो विभागातर्फे कर्करोग समुपदेशन कार्यशाळा गेण्यात आली.



## वृक्षारोपण

दि.३१ ऑक्टोंबर २०२३ रोजी मा.पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत मेरी माती मेरा मेरा देश या मोहिमेच्या सांगता कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी महाविद्यालायातून रासेयो स्वयंसेवक रामेश्वर मोरे, स्वाती चव्हाण व संग्राम निर्मल याची निवड करून कार्क्रमात सहभागी होण्यासाठी पाठवण्यात आले.




## संविधान दिनानिमित्त व्याख्यानाचे आयोजन.

दि. 26 नोव्हेंबर 2022 रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने संविधान दिनानिमित्त सामूहिक संविधान शपथ व व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. "भारतीय संविधानातील मूल्यविचार व सद्यस्थिती" या विषयावर मा. पुरुषोत्तम जाधव यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

संविधानाच्या माध्यमातून संविधान निर्मात्यांनी भारतातील विविध जाती धर्माच्या व पंथाच्या लोकांना एका सूत्रात बांधण्याचे काम केले आहे. समता न्याय व बंधुता या वैश्विक मूल्यांचा समावेश घटनाकारांनी राज्यघटनेत केलेला आहे. परंतु आजही एकविसाव्या शतकात राज्यघटनेतील मूल्यांपेक्षा धार्मिक विचारांचा जनमानसांवरती जास्त पगडा आहे. राज्यघटना ही अनादिकालापासून धार्मिक कर्मकांडांच्या व प्रतिगामी विचारांच्या जोखडात अडकलेल्या जनसामानांच्या मुक्तीचा जाहीरनामा आहे. संविधानिक मूल्यांप्रती समाजामध्ये जनजागृती निर्माण करणे ही काळाची गरज आहे.

देशातील नागरिकांमध्ये संविधानिक मूल्यांप्रति निष्ठा व एक सुजाण नागरिक म्हणून आपली कर्तव्य व जबाबदारी यांचे श्रद्धापूर्वक निर्वाहन करण्याची जाणीव निर्माण करणे हे एक आव्हानात्मक कार्य असले तरी अशक्य मुळीच नाही असे प्रतिपादन मा. पुरुषोत्तम जाधव यांनी केले. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. एम.ए. कव्हळे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी कार्यक्रमाधिकारी डॉ. नितीन ढवळे, डॉ. बिलास काळे, प्रा. उमेश राठोड यांच्यासह रासेयो स्वयंसेवक व विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.






## जागतिक एड्स दिनानिमित्त एड्स जनजागृती रॅलीचे आयोजन.

जागतिक एड्स दिनानिमित्त १ डिसेंबर २०२३ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभाग, रेड रिबन क्लब व आय.सी.टी.सी. विभाग ग्रामीण रुग्णालय माजलगाव यांच्या वतीने एड्स जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. मेडिकल ऑफिसर डॉ.गजानन रुद्रवार यांनी जनजागृती रॅलीस हिरवा झेंडा दाखवून रॅलीची सुरुवात केली. याप्रसंगी आय.सी.टी.सी. विभागाचे समन्वयक श्री शहाबुद्दीन शैख, तंत्रज्ञ रइस सय्यद, कार्यक्रमाधिकारी डॉ. नितीन ढवळे यांच्यासह स्वयंसेवक, विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणावर रॅलीत सहभाग घेतला.







## राज्यस्तरीय आव्हान निवड चाचणी शिबिर बंकटस्वामी महाविद्यालय बीड.

दि.०४-१२-२०२३ रोजी बंकटस्वामी महाविद्यालय बीड येथे दहा दिवसीय राज्यस्तरीय आव्हान शिबिरात सहभागी होण्यासाठी स्वयंसेवकांची निवड चाचणी शिबिर आयोजित करण्यात आले. महाविद्यालयातून विनय चाळक, राजकन्या रेवळे, स्वाती चव्हाण, शीतल चव्हाण या चार स्वयंसेवकांना या निवड शिबिरात सहभागी होण्यासाठी पाठवण्यात आले.

NAAC Re-Accredited 'A' grade
ISO - 9001 :2015 Certified

Prof.Dr.G.K.Sanap
M.Sc.,M.Phil.,Ph.D.
PRINCIPAL

Marathwada Shikshan Prasarak Mandal's
Esta : 1971

**Sunderrao Solanke Mahavidyalaya**

Majalgaon (431 131) Dist. Beed (M.S.)

Affiliated to : Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad
Study Center : Yashwantrao Chavan Maharashtra Open University Nashik(Maharashtra)
Senior Exm Centre No. - 044 - Junior Exm.Centre No. - 57.05.001 - U-Dise No. 27270700128

☎ 02443 - 295037
Email : majalgaon_college123@yahoo.in
Website : www.ssmmajalgaons.com

Ref.No.SSMM/ 2022 - 2023/304 Date : 04 /12/ 2023

प्रती,
मा. संचालक,
राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.

विषय: आव्हान राज्यस्तरीय शिबीर निवड चाचणीसाठी स्वयंसेवक पाठविणे बाबत...
संदर्भ : आपले पत्र क्र. NSS/२०२३-२४/३०५ दिनांक २४/११/२०२३

महोदय,
वरील संदर्भीय विषयानुसार आपणास कळविण्यात येते की, दि. ०४/१२/२०२३ रोजी बंकटस्वामी महाविद्यालय, बीड येथे पार पडणाऱ्या आव्हान राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीर निवड चाचणीसाठी आमच्या सुंदरराव सोळंके महाविद्यालयातून खालील स्वयंसेवक पाठवत आहोत:

| अ.क्र. | स्वयंसेवकाचे नाव | वर्ग |
|---|---|---|
| १ | राजकन्या रमेश रेवळे | बि.कॉम प्रथम वर्ष |
| २ | शीतल मधुकर चव्हाण | बि.कॉम प्रथम वर्ष |
| ३ | विनय रामेश्वर चाळक | बि.कॉम द्वितीय वर्ष |
| ४ | स्वाती मधुकर चव्हाण | बि.कॉम प्रथम वर्ष |

आपल्या माहितीस्तव सादर.
धन्यवाद !

Principal
Sunderrao Solanke Mahavidyalaya
Majalgaon Dist.Beed.(M.S)

## महापरिनिर्वाण दिनानिमित्त व्याख्यानाचे आयोजन.

दि.०६-१२-२०२३ रोजी सुंदरराव सोळंके महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महापरिनिर्वाण दिनानिमित्त कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी प्रा. संजय बागुल यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संसदीय कार्य या विषयावर मार्गदर्शन केले.

याकार्यक्रमाचे अध्यक्ष उपप्राचार्य डॉ. एम. ए. कव्हळे होते. याप्रसंगी प्रमुख वक्ते प्रा. संजय बागुल म्हणाले की भारतीय राज्यघटना बनवताना डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या योगदानामुळे त्यांना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून संबोधले जाते. भारतीय जनतेला मतदानाचा हक्क मिळवून देण्यामध्ये बाबासाहेबांचे योगदान खूप मोठे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बार ॲट-लॉ ही पदवी भारतात सर्वप्रथम मिळवली. त्यांच्याकडे असणाऱ्या कायदेविषयक ज्ञानामुळे त्यांना कायदे पंडित म्हणूनही संबोधले जाते. राज्यघटना लिहिण्याबरोबरच, हिंदू कोड बिल व इत्यादी कायदे बनवण्यामध्ये बाबासाहेबांची योगदान कधीही न विसरता येण्यासारखे आहे असे नमूद केले. बाबासाहेबांनी आपल्या ज्ञानाचा वापर स्वतःसाठी न करता सामाजिक धार्मिक व आर्थिक विषमता नष्ट करण्याकरिता केला. म्हणून विद्यार्थ्यांनी शिक्षणाकडे व्यापक दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे असे मत व्यक्त केले.

डॉ. एम. ए. कव्हळे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांनी महामानवांचा आदर्श विचार आपल्या जीवनात उतरवण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे असे मत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रमाधिकारी डॉ. नितीन ढवळे यांनी केले, स्वयंसेवक राहुल भरीत व योगेश लांडगे यांनी बाबासाहेबांच्या जीवन कार्यावर गीत सादर केले तर आभार कार्यक्रमाधिकारी डॉ. बिलास काळे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यक्रमाधिकारी प्रा. ओ. एच. सारगे, प्रा. उमेश राठोड, राजेभाऊ सोळंके व स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.








## विकसित भारत कार्यक्रम

दि.११-१२-२०२३ रोजी पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांनी उपस्थित प्राध्यापक व विद्यार्थ्यांना विकसित भारत या संकल्पनेवर ऑनलाईन व्यासपीठावरून मार्गदर्शन केले.



## एच.आय.व्ही. एड्स युवा संवाद व्याख्यान

दि. १२-१२-२०२३ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभाग व रेड रिबन क्लब यांच्या वतीने एच.आय.व्ही. एड्स युवा संवाद व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

दैनिक **लोकाशा** महाराष्ट्राच्या मनाचा नकाशा

13DEC2023

### सुंदरराव सोळंके महाविद्यालयात महायुवा संवाद एड्स जनजागरण अभियान



माजलगाव, दि.१२ (लोकाशा न्युज):-दि.१२ डिसेंबर २०२३ रोजी सुंदरराव सोळंके महाविद्यालय माजलगाव येथे रेड रिबन क्लब व जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष, जिल्हा रुग्णालय बीड यांच्या संयुक्त विद्यमाने महायुवा संवाद एच. आय. व्ही./एड्स जनजागरण अभियान या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष, कार्यक्रमअधिकारी श्री.सुहास कुलकर्णी यांनी एड्स बद्दल चे समज गैरसमज विद्यार्थांना समजावून सांगीतले. एच.आय.व्ही/ एड्स पासून बचाव करण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायांची माहिती दिली. तरुणांच्या खांद्यावर उज्वल भारताची जबाबदारी आहे त्यामुळे तरुणांनी या आजारापासून बचाव करण्यासाठी योग्य ती काळजी घेतली पाहिजे. त्यानंतर ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ. योगिता भगत मॅडम यांनी एड्स टाळण्याचे उपाय विद्यार्थांना सांगीतले. कोणकोणत्या माध्यमातून एचआयव्ही एड्स प्रसार होतो याबाबतची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना दिली. आय.सी.टी.सी. विभागाचे समुपदेशक शेख शहाबुद्दीन यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. सुंदरराव सोळंके महाविद्यालय याठिकाणी रेड रिबन क्लब समिती स्थापन करण्यात आली. समिती अध्यक्ष म्हणून रामेश्वर मोरे यांची नियुक्ती करण्यात आली तर सचिवपदी विनय रामेश्वर चाळक या विद्यार्थ्यांची नियुक्ती करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष उपप्राचार्य डॉ.एम.ए.कव्हळे सर यांनी आपल्या अध्यक्षीय समारोपात विद्यार्थ्यांनी समाजामध्ये एड्स या आजाराबद्दल असणाऱ्या गैरसमज याबद्दल जनजागृती करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची आहे असे मत व्यक्त केले. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. एन.के.मुळे, कार्यक्रमअधिकारी डॉ.नितीन ढवळे, डॉ.यु.के.राठोड, डॉ.बी.एस.काळे यांच्यासह प्राध्यापक विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.




## क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती

दि.०३-०१-२०२३ रोजी रासेयो विभाग व महिला कक्षाच्या वतीने सावित्रीबाई फुले जयंती निमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जी.के.सानप होते. डॉ.अर्चना कचरे यांनी उपस्थिताना मार्गदर्शन केले. उपप्राचार्य डॉ.एन.के.मुळे,डॉ.एम.ए.कव्हळे, प्रा.पावन शिंदे, प्रा.प्रकाश गवते यांच्यासह प्राध्यपक व स्वयंसेवक विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.




दैनिक **लोकाशा** महाराष्ट्राच्या मनाचा नकाशा

04JAN2024

### सुंदरराव सोळंके महाविद्यालयात सावित्रीमाई फुले यांची जयंती साजरी



माजलगाव, दि.३ (लोकाशा न्युज):- सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व महिला कक्षाच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जी.के.सानप होते. तसेच उपप्राचार्य डॉ.एन.के. मुळे, प्रा.प्रकाश गवते, सतीश एरंडे यांची विशेष उपस्थिती होती. याप्रसंगी व्ही.आर.लगड यांनी क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. सावित्रीमाई या ज्योतिरावांप्रमाणेच कृतिशील समाजसेवक होत्या असे प्रतिपादन श्री.व्ही.आर. लगड यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयातील महिला कक्षाच्या समन्वयक प्रा.डॉ.ए.ए.कचरे यांनी तर सूत्रसंचालन प्रा.शहाणे यांनी केले. कार्यक्रमाचे आभार श्रीमती स्वामी मॅडम यांनी मानले. कार्यक्रमासाठी रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.नितीन ढवळे, प्रा.डॉ.एस. एन.इप्पर, प्रा.मोतेकर, प्रा.डॉ.डाके, प्रा.डॉ.डि. एस.शिंदे, प्रा.कदम मॅडम, भिसे मॅडम, गुलभीले मॅडम, पुरी मॅडम यांच्यासह प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांची उपस्थिती होती.

## राष्ट्रीय युवा दिनानिमित्त व्याख्यानाचे आयोजन

**राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती निमित्त व्याख्यान**.

राष्ट्रीय सेवा योजना विभाग व रेड रिबन क्लबच्या वतीने दि. 11 जानेवारी रोजी राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीच्या निमित्ताने विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी □ड.भानुदासरावजी डक होते. **राष्ट्रमाता जिजाऊ ते स्वामी विवेकानंद एक विचार** या विषयावर मा.श्री.मधुकर महाराज बारूळकर (कदम) यांनी आपले विचार मांडले. प्रतिगामी विचारांच्या व सरंजामशाहीच्या कालखंडात स्वतंत्र विचार करून स्वराज्याची संकल्पना मांडून तसे संस्कार छत्रपती शिवाजी महाराजांवर करून खऱ्या अर्थाने रयतेचे राज्य साकारणाऱ्या व छत्रपती शिवाजी महाराजांच्या अनुपस्थितीत स्वराज्याचा कारभार पाहणाऱ्या राष्ट्रमाता जिजाऊ या महिला आद्यक्रांतिकारक होत्या. जिजाऊंची शिकवण ही समता न्याय बंधुता या आधुनिक मूल्यांची जोपासना करणारी होती. स्वामी विवेकानंद यांनी खरा धर्म जगाला सांगितला. हिंदू धर्म हा सर्वसमावेशक असून त्यात धार्मिक भेदभाव व जातीभेद याला थारा नाही. स्वामी विवेकानंद व शहीद भगतसिंग यांचा आदर्श घेतला पाहिजे. तरुणांनी व्यवस्थेला प्रश्न विचारायला शिकले पाहिजे, वाचनाचा आवाका वाढवला पाहिजे. 21 व्या शतकात ज्ञानाशिवाय पर्याय नाही. ज्ञान मिळवत असताना विवेक जागृत ठेवला पाहिजे. तार्किक विचार केला पाहिजे. असे प्रतिपादन श्री.मधुकर महाराज बारूळकर यांनी केले.

वैद्यकीय अधिकारी श्रीमती योगिता भगत यांनी राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद हे आजच्या तरुण पिढीचे खरे आदर्श आहेत असे प्रतिपादन केले. □ड.भानुदासरावजी डक यांनी आपल्या अध्यक्षीय समारोपात राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांचे विचार आजही प्रासंगिक आहेत असे प्रतिपादन केले. कार्यक्रमास ग्रा. रु. माजलगाव येथील आयसीटीसी विभागाचे समुपदेशक शेख शहाबुद्दीन रईस सय्यद यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. नितीन ढवळे यांनी केले तर सूत्रसंचालन स्वाती चव्हाण हिने केले. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. एन. के. मुळे, डॉ. एम. ए. कव्हळे, प्रा. पवन शिंदे, प्रा. प्रकाश शिंदे, कार्यालय अधीक्षक श्री. सतीश येरंडे, कुलसचिव प्रशांत सोळंके यांच्यासह स्वयंसेवक, विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.



सोलापूर तरुण भारत — प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक

epaper.dainiktarunbharat.com
13 Jan 2024 - Page 7

### राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती निमित्त व्याख्यान संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१२ जानेवारी**

सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व रेड रिबन क्लबच्या वतीने दि. ११ जानेवारी रोजी राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीच्या निमित्ताने विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ड.भानुदासरावजी डक होते. राष्ट्रमाता जिजाऊ ते स्वामी विवेकानंद एक विचार या विषयावर मा. श्री.मधुकर महाराज बारूळकर (कदम) यांनी आपले विचार मांडले. प्रतिगामी विचारांच्या व सरंजामशाहीच्या कालखंडात स्वतंत्र विचार करून स्वराज्याची संकल्पना मांडून तसे संस्कार छत्रपती शिवाजी महाराजांवर करून खऱ्या अर्थाने रयतेचे राज्य साकारणाऱ्या व छत्रपती शिवाजी महाराजांच्या अनुपस्थितीत स्वराज्याचा कारभार पाहणाऱ्या राष्ट्रमाता जिजाऊ या महिला आद्यक्रांतिकारक होत्या. जिजाऊंची शिकवण ही समता न्याय बंधुता या आधुनिक मूल्यांची जोपासना करणारी होती. स्वामी विवेकानंद यांनी खरा धर्म जगाला सांगितला. हिंदू धर्म हा सर्वसमावेशक असून त्यात धार्मिक भेदभाव व जातीभेद याला थारा नाही. स्वामी विवेकानंद व शहीद भगतसिंग यांचा आदर्श घेतला पाहिजे. तरुणांनी व्यवस्थेला प्रश्न विचारायला शिकले पाहिजे, वाचनाचा आवाका वाढवला पाहिजे. २१ व्या शतकात ज्ञानाशिवाय पर्याय नाही. ज्ञान मिळवत असताना विवेक जागृत ठेवला पाहिजे. तार्किक विचार केला पाहिजे. असे प्रतिपादन श्री.मधुकर महाराज बारूळकर यांनी केले.वैद्यकीय अधिकारी श्रीमती योगिता भगत यांनी राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद हे आजच्या तरुण पिढीचे खरे आदर्श आहेत असे प्रतिपादन केले. ड.भानुदासरावजी डक यांनी आपल्या अध्यक्षीय समारोपात राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांचे विचार आजही प्रासंगिक आहेत असे प्रतिपादन केले. कार्यक्रमास ग्रा. रु. माजलगाव येथील आयसीटीसी विभागाचे समुपदेशक शेख शहाबुद्दीन रईस सय्यद यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. नितीन ढवळे यांनी केले तर सूत्रसंचालन स्वाती चव्हाण हिने केले. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. एन. के. मुळे, डॉ. एम. ए. कव्हळे, प्रा. पवन शिंदे, प्रा. प्रकाश शिंदे, कार्यालय अधीक्षक श्री. सतीश येरंडे, कुलसचिव प्रशांत सोळंके यांच्यासह स्वयंसेवक, विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.



## सल्लागार समिती बैठक

दि. १८ जानेवारी २०२३ रोजी २०२३-२४ विशेष वार्षिक निवासी शिबिराच्या पार्श्वभूमीवर प्राचार्य डॉ.जी.के.सानप यांच्या अध्यक्षतेखाली रासेयो सल्लागार समितीची बैठक आयोजित करण्यात आली.

या बैठकीमध्ये २०२३-२४ या वर्षातील रासेयो विशेष वार्षिक शिबिर मौजे रामपिंपळगाव या दत्तक गावी घेण्याचे नियोजन करण्यात आले तसेच या सात दिवसीय विशेष शिबिराची कार्यक्रमपत्रिका व शिबिराचा कालावधी ठरवण्यात आला. प्राचार्य डॉ.जि.के.सानप यांनी शिबिराच्या अनुषंगाने मार्गदर्शन केले. शेवटी या बैठकीला उपस्थित राहिल्याबद्दल कार्यक्रमाधिकारी डॉ.नितीन ढवळे यांनी सर्वांचे आभार मानले.

## राष्ट्रीय मतदार दिन व्याख्यान व व्हीव्हीपॅट प्रात्यक्षिक कार्यशाळा

दि .25 जानेवारी रोजी सुंदरराव सोळंके महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभाग व तहसील कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने मतदार जनजागृती कार्यक्रम घेण्यात आलात्याचबरोबर ईव्हीएम यंत्राद्वारे . राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना .मतदान कसे करावे याचे विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक दाखवण्यात आले विभागाने घेतलेल्या प्रश्नमंजुषेतील सहभागी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आलेयाप्रसंगी . प्रमुख पाहुण्या .सानप हे होते .के .जी .कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ म्हणून तहसीलदार श्रीमती वर्ष मनाळे यांची उपस्थिती होतीप्रबंधक प्रशांत चव्हाण यांची ,सतीश एरंडे.अधीक्षक श्री ,कव्हळे.ए.एम .उपप्राचार्य डॉ . जास्तीत जास्त .सशक्त लोकशाहीसाठी प्रत्येक मतदाराने मतदानाचा हक्क बजावणे आवश्यक आहे .प्रमुख उपस्थिती होती युवकांनी मतदार यादी मध्ये नाव समाविष्ट करून लोकशाही समृद्ध करण्यासाठी आपले योगदान देण्याचे आवाहन तहसीलदार श्रीमती वर्षा मनाळे यांनी उपस्थितांना केलेलोकशाही व्यवस्थेमध्ये जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी योग्य त्या . व्यक्तीची निवड करण्याची संधी मतदानाच्या माध्यमातून मतदारांना दर पाच वर्षांनी मिळत असते त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने आपला मतदानाचा हक्क लोकशाही बळकट करण्यासाठी बजावणे महत्त्वाचे आहे असे प्रतिपादन डॉ .के.जी . नितीन ढवळे यांनी .कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ .सानप सर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात केले याप् .शिंदे यांनी मानले .एस.डी .केले तर आभार डॉरसंगी कार्यक्रमाधिकारी डॉ ,उमेश राठोड .प्रा ,बिलास काळे . विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणावर ,तहसील कार्यालयातील कर्मचारी यांच्यासह स्वयंसेवक ,महाविद्यालयीन प्राध्यापक


दैनिक लोकाशा
महाराष्ट्राच्या मनाचा नकाशा
28JAN2024

सुंदरराव सोळंके महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त जनजागृतीपर कार्यक्रम

माजलगांव, दि.२७ (लोकाशा न्युज):- सुंदरराव सोळंके महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभाग व तहसील कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने मतदार जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. त्याचबरोबर ईव्हीएम यंत्राद्वारे मतदान कसे करावे याचे विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभागाने घेतलेल्या प्रश्नमंजुषेतील सहभागी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. के. सानप हे होते. प्रमुख पाहुण्या म्हणून तहसीलदार वर्ष मनाळे यांची उपस्थिती होती. उपप्राचार्य डॉ.एम.ए.कव्हळे, अधीक्षक श्री.सतीश एरंडे, प्रबंधक प्रशांत चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. सशक्त लोकशाहीसाठी प्रत्येक मतदाराने मतदानाचा हक्क बजावणे आवश्यक आहे. जास्तीत जास्त युवकांनी मतदार यादी मध्ये नाव समाविष्ट करून लोकशाही समृद्ध करण्यासाठी आपले योगदान देण्याचे आवाहन तहसीलदार श्रीमती वर्षा मनाळे यांनी उपस्थितांना केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.नितीन ढवळे यांनी केले तर आभार डॉ. डी.एस. शिंदे यांनी मानले. याप्रसंगी कार्यक्रमाधिकारी डॉ. बिलास काळे, प्रा. उमेश राठोड, महाविद्यालयीन प्राध्यापक, तहसील कार्यालयातील कर्मचारी यांच्यासह स्वयंसेवक, विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.



.उपस्थिती होती




## रा.से.यो. स्वयंसेवकाने घेतला राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिरात सहभाग.

सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचा स्वयंसेवक विनय चाळक याने गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली येथे 25 डिसेंबर ते 03 जानेवारी 2024 दरम्यान संपन्न झालेल्या चान्सलर्स ब्रिगेड राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिरात (आव्हान-2023-24) सक्रिय सहभाग घेतला.

या शिबिरात स्वयंसेवकांना आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005, अपघातग्रस्ताला करावयाची प्राथमिक स्वरूपाची मदत, फ्लड रेस्क्यू टेक्निक्स, स्विमिंग टेक्निक्स अँड युज ऑफ फ्लोटिंग डिव्हायसेस, आय.आर.बी. बोट हँडलिंग, फायर रेस्क्यू टेक्निक्स, पेशंट लिफ्टिंग अँड मूव्हिंग टेक्निक्स, लँड स्लाईड स्लाईड, सायक्लोन अँड सुनामी, हाय-राइज इक्विपमेंट्स रोप-रेस्क्यू टेक्निक्स इत्यादी बाबींचे एन.डी.आर.एफ.च्या तज्ञ प्रशिक्षकांमार्फत प्रात्यक्षिका सहित प्रशिक्षण देण्यात आले. या शिबिरात राज्यभरातून स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. बीड जिल्ह्यातून विविध महाविद्यालयातून वीस स्वयंसेवकांनी या शिबिरात सहभाग नोंदवला.  दहा दिवसीय शिबिर यशस्वीपणे पूर्ण केल्याबद्दल महाविद्यालय विकास समितीचे सदस्य ऍड. भानुदासरावजी डक, प्राचार्य डॉ.जी.के. सानप सर, उपप्राचार्य डॉ.एन.के.मुळे, डॉ. एम.ए. कव्हळे, प्रा. पवन शिंदे, प्रा. प्रकाश गवते, अधीक्षक श्री. एरंडे, प्रबंधक श्री.पी.आर. चव्हाण यांच्यासह प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले.



## स्वयंसेवकांची विशेष शिबिर पूर्वतयारी बैठक

दि. २७ जानेवारी २०२३ रोजी स्वयंसेवकांची विशेष शिबिरपूर्व बैठक घेण्यात आली. या बैठकीत माजी रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.गणेश ,मोकासरे यांनी स्वयंसेवकांना दि.१ फेब्रुवारी ते ०७ फेब्र्वारी २०२४ या कालावधीत मौजे

रामपिंपळगाव या ठिकाणी आयोजित विशेष शिबीर संदर्भात मार्गदर्शन केले. याप्रसंगी वर्तमान रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.नितीन ढवळे यांनी शिबिराची आचारसंहिता स्वयंसेवकांना समजावून सांगितली. या बैठकीस प्रा.उमेश राठोड, प्रा.सचिन रुद्रवार व डॉ.बिलास काळे यांच्यासह स्वयंसेवकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.







## महाविद्यालयात शिवजयंती उत्साहात साजरी.

19 फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून साजरी करण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. एन. के. मुळे, प्रा. प्रकाश गवते, पवन शिंदे, कार्यक्रमाधिकारी डॉ. नितीन ढवळे, डॉ. बिलास काळे, प्रा. उमेश राठोड, डॉ. सुरेश देशमुख, डॉ. के. बी. गंगणे, डॉ.एस.ए. डाके, प्रा. शिंगणे, श्री. कुरे, श्री. म्हस्के यांच्यासह स्वयंसेवक, विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.



## संत गाडगेबाबा जयंती व बसस्थानक परिसर स्वच्छता

दि.२३ फेब्रुवारी २०२४ रोजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राष्ट्रसंत गाडगेबाबा यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाप्रसंगी अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. के. सानप सर होते. प्रमुख पाहुणे म्हणून इतिहास विभाग प्रमुख डॉ. बी आर बोडके सर उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. बी.आर. बोडके सरांनी राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. संत गाडगेबाबा दिवसा ज्या गावात जायचे तेथील सार्वजनिक ठिकाणाची स्वच्छता करायचे व रात्री कीर्तनरुपी प्रबोधनाच्या माध्यमातून लोकांच्या डोक्यातील विचाररूपी घाण साफ करायचे. गाडगेबाबांचे विचार समाजासाठी  प्रेरणादायी आहेत असे प्रतिपादन केले. राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेला अभिवादन केल्यानंतर स्वयंसेवकांनी शहरातील मध्यवर्ती बसस्थानक परिसराची स्वच्छता केली.

या प्रसंगी उपप्राचार्य डॉ. एम ए कव्हळे, डॉ. एन के मुळे, प्रा. प्रकाश गवते, प्रा. पवन शिंदे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाप्रसंगी प्राध्यापक व स्वयंसेवकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.









## राष्ट्रीय एकात्मता शिबिरात स्वयंसेवकाचा सहभाग

भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व खेल मंत्रालय तसेच राष्ट्रीय सेवा योजना प्रादेशिक संचालनालय लखनऊ, द्वारा आयोजित राष्ट्रीय एकात्मता शिबीर चौधरी चरण सिंह पि.जी.कॉलेज हैंवरा इटावा (उत्तर प्रदेश) येथे दि.११ ते १७ मार्च दरम्यान संपन्न झाले. या शिबिरात सुंदरराव सोळंके महाविद्यालय माजलगाव येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा स्वयंसेवक रामेश्वर परमेश्वर मोरे याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या संघामध्ये सहभाग नोंदवला . देशभरातील विविध राज्यातून राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवक या शिबिरात सहभागी होतात. शिबीरात विविध राज्याची संस्कृती, कलाविष्कार, आचार-विचार यांची देवान-घेवाण व्हावी या उद्देशाने दरवर्षी हे शिबिर आयोजित केले जाते. या शिबिरात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या संघाने महाराष्ट्राच्या संस्कृतीचे विविध कलागुणांनी दर्शन घडवून प्रथम पारितोषिक पटकावले. या संघात सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचा स्वयंसेवक रामेश्वर परमेश्वर मोरे यांने महत्वपूर्ण भुमिका बजावली. शिबिरात आयोजित करण्यात

आलेल्या विविध स्पर्धेत त्याला पारितोषिक मिळाली. त्याचा या यशाबद्दल सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या महाविद्यालय विकास समितीचे प्रमुख □ड. भानुदास डक यांच्यासह प्राचार्य डॉ.जी.के.सानप, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमअधिकारी डॉ.नितीन ढवळे, डॉ.बिलास काळे, प्रा.उमेश राठोड, कार्यालय अधीक्षक श्री. सतीश एरंडे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्याच्या या यशाबद्दल बद्दल अभिनंदन केले.

दैनिक **लोकाशा** महाराष्ट्राच्या मनाचा नकाशा

22MAR2024

## रासेयो स्वयंसेवक रामेश्वर मोरे उत्तरप्रदेश येथील राष्ट्रीय एकात्मता शिबिरात सहभागी

माजलगाव, दि.२१ (लोकाशा न्युज):- भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व खेल मंत्रालय तसेच राष्ट्रीय सेवा योजना प्रादेशिक संचालनालय लखनऊ, द्वारा आयोजित राष्ट्रीय एकात्मता शिबीर चौधरी चरण सिंह पि.जी.कॉलेज हैंवरा इटावा (उत्तर प्रदेश) येथे दि.११ ते १७ मार्च दरम्यान संपन्न झाले. या शिबिरात सुंदरराव सोळंके महाविद्यालय माजलगाव येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा स्वयंसेवक रामेश्वर परमेश्वर मोरे याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या संघामध्ये सहभाग नोंदवला. देशभरातील विविध राज्यातून राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवक या शिबिरात सहभागी होतात. शिबीरात विविध राज्याची संस्कृती, कलाविष्कार, आचार-विचार यांची देवान-घेवाण व्हावी या उद्देशाने दरवर्षी हे शिबिर आयोजित केले जाते.या



संघात सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचा स्वयंसेवक रामेश्वर परमेश्वर मोरे याने महत्वपूर्ण भुमिका बजावली. शिबिरात आयोजित करण्यात आलेल्या विविध स्पर्धेत त्याला पारितोषिक मिळाली. ॲड. भानुदास डक यांच्यासह प्राचार्य डॉ.जी.के.सानप, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमअधिकारी डॉ.नितीन ढवळे, डॉ.बिलास काळे, प्रा.उमेश राठोड, कार्यालय अधीक्षक सतीश एरंडे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक तसेच शिक्षकेतर कर्मचार्यांनी त्याच्या या यशाबद्दल बद्दल अभिनंदन केले.

## कार्यक्रमाधिकारी पी.एफ.एम.एस. प्रक्षिक्षण कार्यक्रम

दि.१५ मार्च २०२४ रोजी बंकटस्वामी महाविद्यालय, बीड येथे एक दिवसीय पी.एफ.एम.एस. प्रक्षिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेसाठी महाविद्यालयातून कार्यक्रमाधिकारी डॉ.नितीन ढवळे व कार्यक्रमाधिकारी डॉ.बिलास काळे यांनी उपस्थिती दर्शवली.

## सल्लागार समिती बैठक

दि.३० मार्च २०२४ रोजी सल्लागार समितीची बैठक घेण्यात आली. १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ या वर्षात रासेयो च्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या कार्यक्रमांचा आढावा व नियमित कार्यक्रम व विशेष शिबीर यांच्यावर झालेल्या खर्चाचा आढावा घेण्यसाठी तसेच खर्चाचे विवरणे व त्याचे अकेंक्षण या संदर्भात चर्चा व सरत्या आर्थिक वर्षात लिहिलेल्या हिशोबाच्या पुस्तकांना मान्यता देण्यासाठी सल्लागार समितीची बैठक महाविद्यालयातील वाणिज्य विभागात घेण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.जि.के.सानप हे होते. २०२३-२४ या वर्षातील हिशोबाच्या पुस्तकांना सर्वानुमते मान्यता देनात आली. कार्यक्रमाधिकारी डॉ. नितीन ढवळे यांनी सर्वाचे आभार मानले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ

*संलग्नित व मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचालित*

# सुंदरराव सोळंके महाविद्यालय

माजलगाव, ता. माजलगाव, जि. बीड (महा)-४३११३१

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

# विशेष शिबीर अहवाल

## २०२३-२४

## प्राचार्य

डॉ.जी.के.सानप

## कार्यक्रमाधिकारी

डॉ. नितीन ढवळे     प्रा. उमेश राठोड     डॉ. बिलास काळे

डॉ.ओ.एच.सारगे

**NOT ME BUT YOU**

# राष्ट्रीय सेवा योजना

## विशेष वार्षिक निवासी शिबिर अहवाल

### मौजे रामपिंपळगाव तालुका. माजलगाव. जिल्हा बीड (महा.)- ४३१ १३१

### शिबिर कालावधी : ०१ फेब्रुवारी ते ०७ फेब्रुवारी २०२४

---

## दि. ०१-०२-२०२४

### शिबीरस्थळी आगमन

सकाळी 10:30 वाजता स्वयंसेवकांचे शिबिर स्थळी आगमन झाले. आगमनानंतर स्वयंसेवकांनी शिबिराच्या नियोजित ठिकाणाची परिसर स्वच्छता केली व बालविवाह प्रतिबंध जनजागृती फेरी काढण्यात आली. दुपारी 12 वाजता उद्घाटन समारंभास सुरुवात झाली.

### शिबिराचा उद्घाटन समारंभ.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दि. ०१ फेब्रुवारी ते ०७ फेब्रुवारी या कालावधीत आयोजित सात दिवसीय विशेष निवासी शिबिराचा उद्घाटन समारंभ दि. ०१ फेब्रुवारी रोजी संपन्न झाला. शिबिराचे उद्घाटन प्राचार्य डॉ.जी.के.सानप यांच्या हस्ते झाले. राष्ट्र उभारणीमध्ये युवकांची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे. युवकांनी शिक्षणाबरोबरच सामाजिक विषयांवर व्यक्त झालं पाहिजे. पर्यावरण संरक्षण, बालविवाह, आपत्ती व्यवस्थापन, अंधश्रद्धा निर्मूलन यासारख्या अनेक सामाजिक प्रश्नांची उकल करण्याची क्षमता युवकांमध्ये आहे. युवकांच्या या क्षमतेला राष्ट्रीय सेवा योजनेच्या विविध उपक्रमांच्या माध्यमातून चालना मिळते. राष्ट्रीय सेवा योजनेमुळे विद्यार्थ्यांचा सामाजिक प्रश्नांकडे बघण्याचा दृष्टिकोन सकारात्मक बनतो. व सकारात्मक दृष्टिकोन असणारा व्यक्तीच समाजामध्ये सकारात्मक बदल घडवण्यासाठी प्रयत्न करतो. असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.जी.के.सानप यांनी केले. यावेळी गावचे सरपंच श्री. रामेश्वर चाळक यांनी आपल्या मनोगतात राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिराच्या माध्यमातून गावात नक्कीच सकारात्मक बदल घडेल असा आशावाद व्यक्त व्यक्त करून सहकार्याची भावना व्यक्त केली. उदघाटन समारंभास प्रमुख उपस्थिती म्हणुन वडवणी येथील लोकमान्य टिळक महाविद्यालयातील मराठी विषयाचे प्राध्यापक डॉ.अशोक खेत्री सर यांनी उपस्थित स्वयंसेवक व गावकरी यांना मार्गदर्शन केले. शिक्षणाचा प्राथमिक उद्देश हा फक्त नोकरी मिळवणे नसून चारित्र्यवान व्यक्ती घडवणे आहे. म्हणून आजच्या युवकांनी शिक्षणाकडे नोकरी मिळवण्याचे साधन म्हणून न पाहता शिक्षणाच्या माध्यमातून स्वतःचा सर्वांगीण विकास कसा घडवता येईल याकडे लक्ष केंद्रित करावे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांना स्वतःच्या व्यक्तिमत्व विकासाची संधी निर्माण होते. विविध उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होऊन राष्ट्रीय चारित्र्य घडविण्यास होण्यास मदत होते असे मत खेत्री सर यांनी व्यक्त केले. दैनिक लोकाशाचे पत्रकार श्री. राम कटारे यांनी त्यांच्या महाविद्यालयीन जीवनातील राष्ट्रीय सेवा योजनेतील अनुभव कथन केले. याप्रसंगी व्यासपीठावर श्रीमती शिवकन्या लांबूड (उपसरपंच), श्री. सिद्धेश्वर आर्डे, श्री अच्युत कदम, श्रीमती आत्राम मॅडम, श्रीमती आव्हाड मॅडम, तलाठी श्री.एस.जी.ओवे, श्री.अमोल माने, कृषी तंत्रज्ञ श्री. गोपीनाथ पवार, प्रा. बालाजी बोडके, डॉ.अरुण पेंटावार, प्रा.सुदर्शन स्वामी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. नितीन ढवळे यांनी केले. सूत्रसंचालन स्वयंसेविका स्वाती

चव्हाण हिने केले तर कार्यक्रमाचे आभार रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. उमेश राठोड यांनी मानले. याप्रसंगी कार्यक्रमाधिकारी डॉ. बिलास काळे, प्रा.ओ.एच.सारगे यांच्यासह रासेयो स्वयंसेवक, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दुपारच्या बौद्धिक सत्रात प्रा. बालाजी बोडके व प्रा. सुदर्शन स्वामी यांनी **आपत्ती व्यवस्थापन काळाची गरज** या विषयावर उपस्थित स्वयंसेवक तसेच गावकऱ्यांना मार्गदर्शन केले. आपत्तीचे प्रकार, आपत्कालीन परिस्थितीत करावयाच्या उपाययोजना, त्याचबरोबर नागरिकांनी घ्यावयाची खबरदारी, इत्यादी विषयावर प्रा. बालाजी बोडके सर यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. आपत्ती कधीही सांगून येत नाही त्यामुळे आपत्तीची पूर्वतयारी करणे महत्त्वाचे आहे. आपत्ती दोन प्रकारची असते एक मानवनिर्मित आणि दुसरी निसर्गनिर्मित. निसर्गनिर्मित आपत्ती थांबवणे जरी मनुष्याच्या हाती नसले तरी मानवनिर्मित आपत्ती मात्र मनुष्य थांबवू शकतो. आपत्कालीन परिस्थितीत मदतीसाठी विद्यार्थ्यांनी नेहमी तत्पर असले पाहिजे. असे प्रतिपादन प्रा. सुदर्शन स्वामी यांनी केले. या कार्यक्रमाप्रसंगी कार्यक्रमाधिकारी डॉ. नितीन ढवळे, डॉ. बिलास काळे, प्रा. उमेश राठोड यांची उपस्थिती होती. या सत्राचे प्रास्ताविक स्वयंसेवक विनय चाळक याने केले तर आभार संग्राम निर्मळ याने मानले. सोपान शेंडगे याने सूत्रसंचालन केले.

सायंकाळच्या सत्रात **समृद्ध भारतासाठी शिवकालीन विचारांची प्रासंगिकता** या विषयावर ह.भ.प. रघुनंदन महाराज आंबेकर यांचे प्रबोधनपर कीर्तन झाले .छत्रपती शिवाजी महाराजांनी साडेचारशे वर्षांपूर्वी स्वराज्याची निर्मिती केली छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य ज्या मूलभूत तत्वावर आधारलेले होते ती तत्वे आजही कशा पद्धतीने काल सुसंगत आहेत हे उदाहरणांच्या माध्यमातून रघुनंदन महाराज आंबेकर यांनी उपस्थित गावकरी व स्वयंसेवकांना समजावून सांगितले. छत्रपती शिवाजी महाराजांचा सामाजिक विचार, त्यांचे संरक्षण खाते, त्यांचा वैज्ञानिक दृष्टिकोन, छत्रपती शिवाजी महाराजांची धर्मसहिष्णुता इत्यादी बाबींवर महाराजांनी प्रकाश टाकला .कार्यक्रमाचे आभार स्वयंसेवक सचिन राठोड यांनी मानले. यानंतर 8 ते 9 या वेळेत स्वयंसेवकांनी जेवण केले व तदनंतर 9 ते 10 या वेळेत कार्यक्रमाधिकारी व स्वयंसेवक यांची गटचर्चा झाली व वेगवेगळ्या सात गटात स्वयंसेवकांना विभागण्यात आले व प्रत्येक गटासाठी गटनेत्याची नियुक्ती करण्यात आली. संध्याकाळी 10 वाजता सर्व स्वयंसेवक आपापल्या खोलीमध्ये विश्रांतीसाठी गेले.

## दि. ०२-०२-२०२४

सकाळी 6 ते 7 या वेळेत योगासने व प्रार्थना घेण्यात आली. सर्व स्वयंसेवकांना योगासनाचे महत्त्व समजावून सांगण्यात आले व त्यांच्याकडून योगासने करून घेण्यात आली. 7 ते 9 या वेळेत स्वयंसेवकांच्या चहा व नाष्ट्याची व्यवस्था करण्यात आली. 9 वाजता गावामध्ये स्वच्छता फेरी काढण्यात आली व त्या माध्यमातून स्वच्छतेबद्दल जनजागृती करण्यात आली. स्वच्छता फेरीनंतर गावातील ग्रामपंचायत कार्यालयासमोरील स्वच्छता व श्रमदान करण्यात आले. श्रमदानंतर स्वयंसेवकांनी दुपारी 12 ते 3 या वेळेत वैयक्तिक स्वच्छता, भोजन व विश्रांती घेतली. भोजन व विश्रांती झाल्यानंतर दुपारी 3 ते 5 या वेळेत **प्लास्टिकचे दुष्परिणाम** या विषयावर प्राणीशास्त्र या विषयाचे प्रा. डॉ.आर.टी.पवार यांनी उपस्थित गावकरी व स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. आज घडीला प्लास्टिकचा वापर मोठ्या प्रमाणावर होतो आहे. प्लास्टिक वापराबाबतच्या निष्काळजीपणामुळे आज मोठ्या प्रमाणावर प्लास्टिक कचऱ्याची समस्या निर्माण झाली आहे. प्लास्टिकचा कचरा कुठेही इतरत्र फेकल्यामुळे प्रदूषणाची समस्या निर्माण झाली आहे. प्लास्टिकच्या वापराचे मानवी आरोग्यावर देखील मोठ्या प्रमाणावर दुष्परिणाम होत आहे. म्हणून प्लास्टिक वापराबाबत लोकांमध्ये जनजागृती निर्माण करणे ही काळाची गरज बनली आहे. प्लास्टिकचा मर्यादित प्रमाणात वापर

त्याचबरोबर वापरलेले प्लास्टिक पुनर्निर्मितीसाठी पाठवणे या व अशा उपाययोजना केल्या तर आपण प्लास्टिकच्या कचऱ्यापासून काही प्रमाणात सुटका मिळू शकतो व पर्यावरणाचा ऱ्हास होण्यापासून वाचवु शकतो असे मत डॉ. आर.टी.पवार यांनी व्यक्त केले. याप्रसंगी डॉ.बिलास काळे यांची प्रमुख उपस्थिती होती. सायंकाळी 5 ते 7 या वेळेत स्वयंसेवकांनी गावकऱ्यांशी संवाद साधला. व गावातील समस्या, शेती विषयक समस्या इत्यादीची माहिती घेतली. सायंकाळच्या सत्रामध्ये वैद्यकीय अधिकारी, ग्रामीण रुग्णालय माजलगाव डॉ. योगिता भगत यांनी **बालविवाहाचे दुष्परिणाम** या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. मुलींचा बालविवाह केल्यामुळे मुलींचे बालपण हिरावल्या जाऊन त्यांना अनेक शारीरिक व मानसिक आजारांना सामोरे जावे लागते व त्यांच्यावर अकाली मातृत्व लादल्या जाते. ही अतिशय दुर्दैवी गोष्ट आहे असे प्रतिपादन त्यांनी केले. यावेळी प्रा. सुदर्शन स्वामी व प्रा. पेंटावार सर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कमी वयात लग्न केल्यामुळे मुलींना तर अनेक शारीरिक व मानसिक समस्यांना सामोरे जावे लागते त्याचबरोबर जन्मणारे मुलही कुपोषित जन्म घेते व अशा मुलांना Child Born Adult Desease होण्याचा धोका सर्वात जास्त असतो. त्यामुळे देशाचे भविष्य घडवायचं असेल तर निरोगी व सशक्त युवा पिढी निर्माण होणे गरजेचे आहे व त्याकरिता बालविवाहास आळा घालने क्रमप्राप्त आहे असे प्रतिपादन केले. याप्रसंगी कार्यक्रमाधिकारी डॉ. नितीन ढवळे प्रा. उमेश राठोड व डॉ. बिलास काळे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संग्राम निर्मळ यांनी केले तर आभार सचिन राठोड याने मानले. कार्यक्रमास गावचे सरपंच श्री रामेश्वर चाळक, उपसरपंच शिवकन्या लांबूड, यांच्यासह स्वयंसेवक व गावकऱ्यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. संध्याकाळी 9 ते 10 या वेळेत जेवण करून सर्व सवय सेवक आपापल्या रूममध्ये विश्रांतीसाठी गेले.

## दि. ०३-०२-२०२४

सकाळी 6 ते 7 या वेळेत योगासने व प्रार्थना घेण्यात आली. 7 ते 9 या वेळेत स्वयंसेवकांच्या चहा व नाष्ट्याची व्यवस्था करण्यात आली. सकाळी 9 ते 12 या वेळेत गावातील स्मशानभूमी परिसरातील स्वच्छता व श्रमदान करण्यात आले. श्रमदानामध्ये गावकऱ्यांनीही उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. श्रमदानंतर स्वयंसेवकांनी दुपारी 12 ते 3 या वेळेत वैयक्तिक स्वच्छता, भोजन व विश्रांती घेतली. दुपारच्या सत्रात **कवी संमेलनाचे आयोजन** करण्यात आले .या कवी संमेलनात कविवर्य श्रीखिलबा काळे, श्री मोहन राठोड, व श्री गोविंद गोचडे यांनी सहभाग घेतला. या तीनही कवींनी विविध सामाजिक विषयावर नातेसंबंधावर पर्यावरण विषयक विषयावर वेगवेगळया कविता सादर केल्या. या कवितांनी उपस्थित गावकरी व स्वयंसेवकांची मने जिंकली. या कवी संमेलनाच्या अध्यक्षस्थानी सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील मराठी विभागाचे विभागप्रमुख डॉक्टर भाऊसाहेब राठोड होते. कार्यक्रमाचे आभार पूजा राठोड हिने मानले. सायंकाळी 5 ते 7 या वेळेत स्वयंसेवकांनी क्रिकेट या खेळाचा आनंद घेतला. खेळामुळे शारीरिक हालचाली बरोबरच स्वयंसेवकांमध्ये सांघिक भावना वय जिंकण्याची उमेद या आंतरिक प्रेरणेस चालना मिळते. संध्याकाळच्या सत्रामध्ये **झाड माझ्याशी बोलतय**...या विषयावर **वृक्षमित्र श्री सुधाकर देशमुख** यांच्या प्रबोधनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. श्री सुधाकर देशमुख यांना वृक्ष संवर्धन या क्षेत्रात त्यांनी केलेल्या अतुलनीय कामगिरीमुळे महाराष्ट्र शासनाने 2023 या वर्षाचा छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार देऊन गौरव केला आहे. श्री सुधाकर देशमुख वृक्ष संवर्धन व लागवड या विषयावर संपूर्ण महाराष्ट्रात फिरून प्रबोधन करत असतात एवढेच नव्हे तर ज्या ज्या ठिकाणी ते व्याख्यानासाठी किंवा कार्यक्रमासाठी जातात जाताना आपल्या सोबत स्वतःच्या घराच्या पाठीमागे निर्माण केलेल्या रोपवाटिकेतील रोपे सोबत घेऊन जातात

त्याचबरोबर त्या रोपांची लागवड त्या गावांमध्ये करतात. आज पर्यंत त्यांनी पंधरा लाखांपेक्षाही जास्त स्वतः निर्माण केलेली रोपे विविध कार्यक्रमाप्रसंगी भेट दिलेली आहेत. श्री सुधाकर देशमुख यांनी स्वरचित गाण्यांच्या माध्यमातून गावकऱ्यांना तसेच स्वयंसेवकांना वृक्ष संवर्धन व लागवडीचे महत्त्व समजावून सांगितले. उजाड झाला डोंगर सारा उजाड झाला गाव एक तरी झाड लाव माणसा एक तरी रोप लाव या स्वरचित गाण्याच्या सादरीकरणाला उपस्थित गावकरी व स्वयंसेवकांनी भरभरून दाद दिली. त्याचबरोबर प्रत्येक व्यक्तीने आपल्या घरासमोर एक तरी झाड लावले पाहिजे व त्याची नोंद ग्रामपंचायती किंवा पंचायतच्या दरबारी केली पाहिजे जेणेकरून गावात एकूण किती झाडे आहेत, एवढेच नव्हे तर तालुक्यात किती झाडे आहेत, जिल्ह्यात किती झाडे आहेत, राज्यात किती झाडे आहेत, याची वास्तववादी माहिती आपल्याला मिळेल व या माहितीचा आधार घेऊन वृक्ष संवर्धन विषयक धोरण ठरविताना मदत होईल असा मौलिक विचार सांगितला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी गावचे सरपंच श्री रामेश्वर चाळक हे होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक तसेच आभार कार्यक्रमाधिकारी डॉक्टर नितीन ढवळे यांनी मानले. संध्याकाळी 9 ते 10 या वेळेत जेवण करून सर्व सवय सेवक आपापल्या रूममध्ये विश्रांतीसाठी गेले.

## दि. ०४-०२-२०२४

सकाळी 6 ते 7 या वेळेत योगासने व प्रार्थना घेण्यात आली. 7 ते 9 या वेळेत स्वयंसेवकांच्या चहा व नाष्ट्याची व्यवस्था करण्यात आली. ९ ते १२ या वेळेत स्वयंसेवकांनी श्रमदान केले. श्रमदानंतर स्वयंसेवकांनी दुपारी 12 ते 3 या वेळेत वैयक्तिक स्वच्छता, भोजन व विश्रांती घेतली. भोजन व विश्रांती झाल्यानंतर दुपारी 3 ते 5 या वेळेत '**माझे मत माझा अधिकार**' या विषयावर डॉ. डी.एस. शिंदे यांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावातील उपसरपंच श्री. रवींद्र लांबुड हे होते. लोकशाही राज्यव्यवस्थेमध्ये शासनातील प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार प्रत्येक नागरिकाला मताधिकाऱ्याच्या स्वरूपात मिळालेला आहे. त्यामुळे समाज उपयोगी कामे करणाऱ्या व्यक्तीला निवडून देऊन आपण आपला हक्क बजावला पाहिजे. सशक्त लोकशाहीसाठी मतदानाचा हक्क बजावणे अत्यंत आवश्यक आहे असे प्रतिपादन सरांनी केले. सायंकाळी 5 ते 7 या वेळेत स्वयंसेवकांनी खेळाचा आनंद घेतला. संध्याकाळी 7 ते 9 या वेळेत 8 ते 9 या वेळेत स्वयंसेवक रामेश्वर मोरे याने गावकऱ्यांसमोर प्रबोधनपर कीर्तन सादर केले. संध्याकाळी 9 ते 10 या वेळेत जेवण करून सर्व सवय सेवक आपापल्या रूममध्ये विश्रांतीसाठी गेले.

## दि. ०५-०२-२०२४

सकाळी 6 ते 7 या वेळेत योगासने व प्रार्थना घेण्यात आली. 7 ते 9 या वेळेत स्वयंसेवकांच्या चहा व नाष्ट्याची व्यवस्था करण्यात आली. सकाळी 9 ते 12 या वेळेत गावातील पानंद रस्ता व मुख्य रस्त्याच्या स्वच्छता करण्यात आली. दुपारी 12 ते 3 या वेळेत स्वयंसेवकांनी वैयक्तिक स्वच्छता झाल्यानंतर भोजन करून विश्रांती घेतली. दुपारच्या सत्रात **जागतिक तापमान वाढ व शेती व्यवसायातील समस्या** या विषयावर डॉ. आय.बी. साळुंखे व डॉ. एम.एस. वानखडे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. वाढते प्रदूषण व पर्यावरणाच्या होत असलेल्या ऱ्हासामुळे जागतिक तापमान वाढ ही एक मोठी समस्या आज जगासमोर उभी आहे. जागतिक तापमान वाढीचा परिणाम जवळपास सर्वच घटकांवर होत आहे. शेती क्षेत्रावर सुद्धा जागतिक तापमान वाढीमुळे खूप मोठे संकट निर्माण झाले आहे. वातावरणातील बदलामुळे शेती उत्पादनावर परिणाम होत आहे परिणामी शेतकऱ्याची उत्पन्न घटत चालले आहे. आधीच अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांच्या अडचणीमध्ये आणखीनच भर पडत आहे असे प्रतिपादन डॉ. आय.बी. साळुंखे सर यांनी केले. भारत हा कृषिप्रधान

देश आहे भारतातील बहुसंख्य लोक उपजीविकेसाठी शेती क्षेत्रावर अवलंबून आहेत. परंतु जागतिक तापमान वाढीच्या समस्येमुळे शेतीतील उत्पादकता घटून शेती क्षेत्रावर अवलंबून असणाऱ्या लोकांसमोर उपजीविकेचा प्रश्न निर्माण झाला आहे. प्रामुख्याने शेतकरी या समस्येमुळे संकटात सापडला आहे. जागतिक तापमान वाढ हा प्रश्न जर सोडवायचा असेल तर यासाठी दीर्घकालीन उपाययोजना करण्याची आवश्यकता डॉ. एम.एस. वानखडे सर यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. परमेश्वर चाळक हे होते. कार्यक्रमाचे आभार स्वयंसेवक रामेश्वर मोरे यांनी मानले.

संध्याकाळी 7 ते 8 या वेळेत **संतांनी सांगितलेला खरा भक्तिमार्ग** या विषयावर प्रा.अर्जुन तनपुरे यांनी उपस्थित गावकरी व स्वयंसेवकांचे प्रबोधन केले. संतांनी सांगितलेल्या भक्तिमार्गामध्ये संतांनी कुठेही अंधश्रद्धा व कर्मकांडांना स्थान दिले नाही. परंतु आज त्याच संतांच्या नावाने समाजामध्ये कर्मकांड केले जात आहे. संतांनी सांगितलेला खरा भक्तिमार्ग लोकांपर्यंत न पोहोचवता त्यांची दिशाभूल केली जात आहे. संतांनी व्यक्तीच्या आत्मिक उन्नतीसाठी परमार्थ करण्याचा उपदेश केला. परंतु असे करत असताना त्यांनी कुठेही कर्मकांड करा म्हणून सांगितले नाही.

**सत्य-असत्याशी मन केले ग्वाही!**

**मानियले नाही बहुमता !!**

कुणी कितीही काहीही सांगितले तरी तुमच्या सदसदविवेक बुद्धीचा वापर करून जे सत्य आहे त्याचा स्वीकार करा असत्याचा धिक्कार करा असा उपदेश संतांनी केला. आजच्या गुंतागुंतीच्या जीवनशैलीमध्ये प्रत्येकाला वैयक्तिक व सार्वजनिक जीवनामध्ये काही ना काही तरी समस्या असतात, मानसिक ताणतणाव असतात व ते दूर करण्यासाठी आपण कोणत्याही भोंदू बाबाच्या आहारी न जाता स्वतःच्या आत्मिक व भौतिक उन्नतीचा मार्ग स्वतःच शोधला पाहिजे हे संतांना अपेक्षित आहे.

**"जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले!**

**तोचि साधू ओळखावा, देव तेथेची जाणावा !!"**

या संत तुकाराम महाराजांच्या अभंगाचा दाखला देत त्यांनी आपल्या प्रबोधनात सुरुवात केली. खरा देव हा माणसांची सेवा करण्यात आहे, माणसांची दुःख कमी करण्यात आहे. एकमेकांच्या सहकार्यात आहे हाच विचार संतांनी आपल्या साहित्यातून समाजापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केलेला आहे. खऱ्या अर्थाने निष्कलंक, निष्कपट व चारित्र्यसंपन्न जीवन जगण्याचा मंत्र संतांनी आपल्या संत साहित्यातून दिलेला आहे. समाजाला अज्ञानरूपी अंधकारातून बाहेर काढण्यासाठी संतांनी अभंगांच्या माध्यमातून समाजाला उपदेश केला आहे.

**ऐसे कैसे झाले भोंदू, कर्म करोनी मनती साधू !**

**अंगा लावूनिया राख, डोळे झाकूनीया करती पाप !**

**दावी वैराग्याची कळा, भोगी विषयाचा सोहळा !!**

आणि याच अज्ञानरूपी अंधकाराचा फायदा समाजातील काही भोंदू लोक घेत असतात त्यांच्यापासून आपण सावध राहिले पाहिजे असा उपदेश संतांनी केला असे प्रतिपादन प्रा.अर्जुन तनपुरे यांनी केले. याप्रसंगी अध्यक्षस्थानी श्री. आबासाहेब चाळक होते. संध्याकाळी 9 ते 10 या वेळेत जेवण करून सर्व सवय सेवक आपापल्या रूममध्ये विश्रांतीसाठी गेले.

## दि. ०६-०२-२०२४

सकाळी 6 ते 7 या वेळेत योगासने व प्रार्थना घेण्यात आली. 7 ते 9 या वेळेत स्वयंसेवकांच्या चहा व नाष्ट्याची व्यवस्था करण्यात आली. सकाळी 9 ते 12 या वेळेत गावातील पानंद रस्ता व नालेसफाई करण्यात आली. यावेळी गावकऱ्यांनी श्रमदानामध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. दुपारी 12 ते 1 या वेळेत स्वयंसेवकांनी भोजन करून विश्रांती घेतली. दुपारी 3 ते 5 या वेळेत **एच.आय.व्ही. एड्स तपासणी शिबिर** घेण्यात आले. ग्रामीण रुग्णालय माजलगाव येथील आरोग्य कर्मचारी श्री. शहाबुद्दीन शेख (समुपदेशक), तंत्रज्ञ श्री. रईस सय्यद यांनी स्वयंसेवकांसह गावकऱ्यांची तपासणी केली. या

तपासणी शिबिरामध्ये महिला व पुरुष मिळून ८० लोकांनी सहभाग नोंदवला. तपासणी बरोबरच श्री. शहाबुद्दीन शेख यांनी एच.आय.व्ही. एड्स या आजाराच्या बाबतीत उपस्थितांचे समुपदेशन केले. सायंकाळी 5 ते 7 या वेळेत स्वयंसेवकांनी गावांमध्ये जाऊन बालविवाहाच्या संबंधित सर्वेक्षण केले.

सायंकाळी 7 वाजता **भजन संध्या व प्रबोधनपर गीत गायन** या सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात गावातील सरपंच श्री. रामेश्वर चाळक, स्वयंसेवक रामेश्वर मोरे, कार्यक्रमाधिकारी डॉ. नितीन ढवळे व प्रा. उमेश राठोड यांनी भजन गायन व प्रबोधन पर गीतांचे सादरीकरण गावकऱ्यांसमोर केले. संध्याकाळी 9 ते 10 या वेळेत जेवण करून सर्व स्वयंसेवक आपापल्या खोलीमध्ये विश्रांतीसाठी गेले.

## दि. ०७-०२-२०२४

सकाळी 6 ते 7 या वेळेत योगासने व प्रार्थना घेण्यात आली. 7 ते 9 या वेळेत स्वयंसेवकांच्या चहा व नाष्ट्याची व्यवस्था करण्यात आली. 9 ते 10 या वेळेत स्वयंसेवकांनी गावातील राम मंदिर परिसरातील स्वच्छता करून श्रमदान केले. 10 ते 11 या वेळेत स्वयंसेवकांनी वैयक्तिक स्वच्छता करून तदनंतर गावातून जनजागृती फेरी काढण्यात आली. या जनजागृती फेरीमध्ये बालविवाह प्रतिबंधाच्या संबंधित अनेक घोषणा स्वयंसेवकांनी दिल्या. सकाळी 11 वाजता शिबिराच्या समारोप कार्यक्रमाच्या अनुषंगाने तयारी करण्यात आली.

## समारोप समारंभ

शिबिराच्या समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जी.के.सानप यांची उपस्थिती होती. प्रमुख पाहुणे म्हणून दैनिक सकाळचे पत्रकार मा. कमलेश जाब्रस हे उपस्थित होते. राष्ट्रीय सेवा योजना शिबिराच्या माध्यमातून स्वयंसेवकांमधील सुप्त कलागुणांना वाव मिळतो. भारत हा तरुणांचा देश आहे. त्यामुळे, देशाला तरुणांकडून मोठ्या अपेक्षा आहेत. देशाला महासत्ता बनवायचे असेल तर, देशातील तरुणांमध्ये कौशल्य विकासाबरोबरच व्यक्तिमत्व विकास होणे तितकेच महत्त्वाचे आहे असे प्रतिपादन मा. कमलेश जाब्रस यांनी केले. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. एन.के. मुळे व डॉ. एम.ए. कव्हळे यांनीही आपल्या भाषणात राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी जीवनातील महत्त्व अधोरेखित केले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून गावकऱ्यांच्या सहकार्याने गावातील सर्व घटकांना सोबत घेऊन आदर्श गाव या संकल्पनेला मूर्त स्वरूप देता येते असे मत प्राचार्य डॉ. जी.के. सानप सर यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात व्यक्त केले. समारोप कार्यक्रमाप्रसंगी सरपंच रामेश्वर चाळक यांच्यासह स्वयंसेवक अथर्व शेटे, विनय चाळक, व झाशी वजीर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाधिकारी डॉ. नितीन ढवळे यांनी प्रास्ताविक व अहवाल वाचनात बालविवाह प्रतिबंध, मतदान जनजागृती, व्यसनमुक्ती, एचआयव्ही एड्स जनजागृती व तपासणी, चमत्कार व विज्ञान, ग्रामविकासात ग्रामपंचायतीची भूमिका, इत्यादी विषयावर आयोजित व्याख्यान तसेच जनजागृतीपर सांस्कृतिक कार्यक्रम यांच्या यशस्वी आयोजनाबद्दल माहिती दिली. स्वयंसेवक रामेश्वर मोरे याने तर कार्यक्रमाचे आभार प्रा. उमेश राठोड यांनी मांनले. याप्रसंगी कार्यक्रमाधिकारी डॉ. बिलास काळे, प्रा.ओमप्रसाद सारगे, प्रा. अरुण पेंटावार, डॉ.सतीश डाके, प्रा. सुदर्शन स्वामी यांच्यासह प्राध्यापक,शिक्षकेतर कर्मचारी, स्वयंसेवक व गावकऱ्यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. शिबिराच्या यशस्वीतेसाठी श्री. बंडू झोडगे, श्री. धिरडे, श्री. डिगंबर तौर, श्री. परमेश्वर चाळक यांनी परिश्रम घेतले.

## रासेयो शिबीर उदघाटन समारंभ








## शिबीर स्थळ स्वच्छता







## बालविवाह प्रतिबंध फेरी









## स्वयं परिचय सत्र







## आपत्ती व्यवस्थापन व्याख्यान




## प्रबोधनपर व्याख्यान







## मानसीक आरोग्य विषयावर व्याख्यान



## कवीसंमेलन















**झाड माझ्याशी बोलतंय....कार्यक्रम**















## प्रा.अर्जुन तनपुरे “संतानी सांगितलेला खरा भक्तिमार्ग”






## प्रातः योग व प्राणायाम







## माझे मत माझा अधिकार व्याख्यान










## श्रमदान






















## HIV AIDS Counselling & Testing Camp





## सांस्कृतिक कार्यक्रम सुगम गीत गायन




## भजन संध्या




## आपत्कालीन बचाव तंत्र प्रात्यक्षिक



## बालविवाह प्रतिबंध लघुपट दृष्यफीत






## बालविवाह सर्वेक्षण



## समारोप समारंभ



















## स्वयंसेवकांना पुस्तक भेट देताना गावकरी




## सहभोजन


















सोलापूर
तरुण भारत
प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक
न मे कर्मफले स्पृहा
संभाजीनगर, सातारा, सोलापूर, अहमदनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून प्रकाशित
epaper.dainiktarunbharat.com
03 Feb 2024 - Page 7

## राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिराचा उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२ फेब्रुवारी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने युवकांचा नारा, स्वच्छ व समृद्ध भारत सारा हे ब्रीद घेऊन सात दिवसीय विशेष निवासी शिबिराचा उद्घाटन समारंभ दि. ०१फेब्रुवारी रोजी करण्यात आले.

शिबिराचे उद्घाटन प्राचार्य डॉ. जी.के.सानप यांच्या हस्ते झालेकार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंच रामेश्वर चाळक होते. यावेळी अशोक खेत्री,श्रीमती शिवकन्या लांबूड ( उपसरपंच), सिद्धेश्वर आर्डे, अच्युत कदम, श्रीमती आत्राम मॅडम, श्रीमती आव्हाड , तलाठी एस. जी. ओवे, अमोल माने, गोपीनाथ पवार,प्रा. बालाजी बोडके, डॉ.अरुण पेंटावर, प्रा.सुदर्शन स्वामी,प्रा सतीश डाके, प्रा कृष्णा लंगडे यांची उपस्थिती होती.



यावेळी उदघाटन पर भाषणात बोलताना प्राचार्य डॉ जी. के.सानप म्हणाले की राष्ट्र उभारणीमध्ये युवकांची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे. युवकांनी शिक्षणाबरोबरच सामाजिक विषयांवर व्यक्त झालं पाहिजे. पर्यावरण संरक्षण, बालविवाह, आपत्ती व्यवस्थापन, अंधश्रद्धा निर्मूलन यासारख्या अनेक सामाजिक प्रश्नांची उकल करण्याची क्षमता युवकांमध्ये आहे. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा. अशोक खेत्री यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांना स्वतःच्या व्यक्तिमत्व विकासाची संधी निर्माण होते. विविध उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होऊन राष्ट्रीय चारित्र्य घडविण्यास होण्यास मदत होते असे मत व्यक्त केले. यावेळी गावचे सरपंच श्री. रामेश्वर चाळक यांनी आपल्या अध्यक्षीय समारोपात राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिराच्या माध्यमातून गावात नक्कीच सकारात्मक बदल घडेल असा आशावाद व्यक्त व्यक्त करून सहकार्याची भावना व्यक्त केली. याप्रसंगी राम कटारे यांनी त्यांच्या महाविद्यालयीन जीवनातील राष्ट्रीय सेवा योजनेतील अनुभव कथन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. नितीन ढवळे यांनी केले. सूत्रसंचालन स्वयंसेविका स्वाती चव्हाण हिने केले तर कार्यक्रमाचे आभार रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. उमेश राठोड यांनी मानले. याप्रसंगी कार्यक्रमाधिकारी डॉ. बिलास काळे, प्रा. ओ. एच. सारगे यांच्यासह रासेयो स्वयंसेवक, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दिव्य मराठी
बीड जिल्हा 08-02-2024



विद्यार्थ्यांना रोपे भेट देताना उपस्थित मान्यवर.

## विद्यार्थ्यांना दिली रोपे भेट

### वृक्षमित्र सुधाकर देशमुख यांचा उपक्रम

**प्रतिनिधी | माजलगाव**

रामपिंपळगाव, सातेफळ आणि कुंबेफळ येथे वृक्षमित्र सुधाकर देशमुख यांनी झाड माझ्याशी बोलतेय हा गीत संवाद कार्यक्रम घेऊन विद्यार्थ्यांना रोपे भेट देऊन पर्यावरणाचे महत्व सांगितले.

माजलगाव येथील सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या वतीने राम पिंपळगाव येथे ३ फेब्रुवारी २०२४ रोजी झाड माझ्याशी बोलते या कार्यक्रमात वृक्षमित्र सुधाकर देशमुख यांनी विद्यार्थ्यांना रोपे भेट दिली. अंबाजोगाई येथील कला व वाणिज्य महिला महाविद्यालयाच्या वतीने ५ फेब्रुवारी रोजी सातेफळ येथे झाड माझ्याशी बोलतय हा गीत संवाद कार्यक्रम झाला. यावेळी विद्यार्थिनींना रोप भेट दिले.

स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालय अंबाजोगाई यांच्या वतीने कुंबेफळ येथे राष्ट्रीय सेवा योजना शिबिर ६ फेब्रुवारी २०२४ रोजी दुपारी तीन वाजता पार पडले.

या ठिकाणी झाड माझ्याशी बोलतय कार्यक्रमात विद्यार्थ्यांना सुधाकर देशमुख यांनी रोपे भेट दिली.

दैनिक जय महाभारत
संपादक - विठ्ठलकुमार बायस
Saturday 2024/02/03

## सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिराचे उद्घाटन संपन्न

माजलगाव : अमर साळवे
(दै.महाभारत)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने युवकांचा नारा, स्वच्छ व समृद्ध भारत सारा हे ब्रीद घेऊन सात दिवसीय विशेष निवासी शिबिराचा उद्घाटन समारंभ दि. ०१फेब्रुवारी रोजी करण्यात आले.



शिबिराचे उद्घाटन प्राचार्य डॉ. जी.के.सानप यांच्या हस्ते झाले.कार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंच रामेश्वर चाळक होते. यावेळी प्रा. अशोक खेत्री,श्रीमती शिवकन्या लांबूड( उपसरपंच), सिद्धेश्वर आर्डे, अच्युत कदम, श्रीमती आत्राम , श्रीमती आव्हाड , तलाठी एस. जी. ओवे, अमोल माने, गोपीनाथ पवार,प्रा. बालाजी बोडके, डॉ.अरुण पेंटावर, प्रा.सुदर्शन स्वामी,प्रा सतीश डाके, प्रा कृष्णा लंगडे यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी उदघाटनपर भाषणात बोलताना प्राचार्य डॉ जी. के.सानप म्हणाले की राष्ट्रउभारणीमध्ये युवकांची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे. युवकांनी शिक्षणाबरोबरच सामाजिक विषयांवर व्यक्त झालं पाहिजे. पर्यावरण संरक्षण, बालविवाह, आपत्ती व्यवस्थापन, अंधश्रद्धा निर्मूलन यासारख्या अनेक सामाजिक प्रश्नांची उकल करण्याची क्षमता युवकांमध्ये आहे. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा. अशोक खेत्री यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांना स्वतःच्या व्यक्तिमत्व विकासाची संधी निर्माण होते. विविध उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होऊन राष्ट्रीय चारित्र्य घडविण्यास होण्यास मदत होते असे मत व्यक्त केले. यावेळी गावचे सरपंच श्री. रामेश्वर चाळक यांनी आपल्या अध्यक्षीय समारोपात राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिराच्या माध्यमातून गावात नक्कीच सकारात्मक बदल घडेल असा आशावाद व्यक्त व्यक्त करून सहकार्याची भावना व्यक्त केली. याप्रसंगी राम कटारे यांनी त्यांच्या महाविद्यालयीन जीवनातील राष्ट्रीय सेवा योजनेतील अनुभव कथन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. नितीन ढवळे यांनी केले. सूत्रसंचालन स्वयंसेविका स्वाती चव्हाण हिने केले तर कार्यक्रमाचे आभार रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. उमेश राठोड यांनी मानले. याप्रसंगी कार्यक्रमाधिकारी डॉ. बिलास काळे, प्रा. ओ. एच. सारगे यांच्यासह रासेयो स्वयंसेवक, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक लोकाशा
महाराष्ट्राच्या मनाचा नकाशा
09FEB2024

## सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या रासेयो शिबिराचा समारोप

माजलगाव, दि.८ (लोकाशा न्युज):- मौजे रामपिंपळगाव येथे दि.०१ ते ०७ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत आयोजित सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विशेष शिबिराचा समारोप समारंभ दि.०७ फेब्रुवारी रोजी संपन्न झाला. या शिबिरात दैनंदिन श्रमदानाबरोबरच, बालविवाह, पर्यावरण संवर्धन, जल व्यवस्थापन, घनकचरा व्यवस्थापन, आधुनिक ग्राम, व्यसनमुक्ती, मतदान जनजागृती, इत्यादी विषयांवर जनजागृती तसेच प्रबोधन करण्यात आले. शिबिराच्या समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जी.के.सानप यांची उपस्थिती होती. प्रमुख पाहुणे म्हणून कमलेश जाब्रस हे उपस्थित होते. राष्ट्रीय सेवा योजना शिबिराच्या माध्यमातून स्वय सेवकांमधील सुप्त कलागुणांना वाव मिळतो. भारत हा तरुणांचा देश आहे. त्यामुळे, देशाला तरुणांकडून मोठ्या अपेक्षा आहेत. देशाला महासत्ता बनवायचे असेल तर, देशातील तरुणांमध्ये कौशल्य विकासा बरोबरच व्यक्तिमत्व विकास होणे तितकेच महत्त्वाचे आहे असे प्रतिपादन कमलेश जाब्रस यांनी केले. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ.एन.के. मुळे व डॉ.एम.ए. कव्हळे यांनीही आपल्या भाषणात राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी जीवनातील महत्त्व अधोरेखित केले. स्वयंसेवक रामेश्वर मोरे याने तर कार्यक्रमाचे आभार प्रा.उमेश राठोड यांनी मानले. याप्रसंगी कार्यक्रमाधिकारी डॉ. बिलास काळे, प्रा.ओमप्रसाद सारगे, प्रा.अरुण पेंटावार, डॉ.सतीश डाके, प्रा. सुदर्शन स्वामी यांच्यासह प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, स्वयंसेवक व गावकर्यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. शिबिराच्या यशस्वीतेसाठी बंडू झोडगे, धिरडे, डिगंबर तौर, परमेश्वर चाळक यांनी परिश्रम घेतले.

